
# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com | E-Mail : prajasattaknews24@gmail.com | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२१७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि.२५ सप्टेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## सत्ता आल्यावर कसा निवडला जाणार मविआचा मुख्यमंत्री? पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितला फॉर्म्युला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५मुंबई**

महाराष्ट्रात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत विजय मिळवून सत्तेत पुनरागमन करण्यासाठी महाविकास आघाडीने कंबर कसली आहे. सध्या जागावाटपावरून असलेले मतभेद मिटवून जागावाटपाची प्रक्रिया पूर्ण करण्यात महाविकास आघाडीमधील घटक पक्ष गुंतले आहेत. मात्र जागावाटपापेक्षा मुख्यमंत्रिपद हा महाविकास आघाडीमध्ये कळीचा मुद्दा ठरण्याची शक्य आहे. मुख्यमंत्रिपदासाठी आघाडीतील तिन्ही पक्ष इच्छूक असल्याने मुख्यमंत्रिपदावरून तिढा निर्माण होण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी महाविकास आघाडीमधील मुख्यमंत्रिपदाचा फॉर्म्युला सांगितला आहे. महाराष्ट्रामध्ये ज्या पक्षाचे आमदार जास्त त्याचा मुख्यमंत्री, अशी परंपरा राहिली आहे. २०१९ मध्ये शिवसेनेलाही त्यामुळेच मुख्यमंत्रिपद देण्यात आलं होतं, असे सांगितले.



मुंबईत सुरू असलेल्या इंडिया टुडे कॉन्क्लेव्हमध्ये पृथ्वीराज चव्हाण यांनी हे विधान केले. ते म्हणाले की, आम्ही लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडी ३२ जागांवर विजय मिळवेल, असा अंदाज वर्तवला होता. तसेच आम्ही ३१ जागांवर जिंकलो. आता आम्ही विधानसभा निवडणुकीमध्येही विजय मिळवू. यावेळीही काँग्रेस पक्षाकडून अतिआत्मविश्वासामधून होणाऱ्या चुकांची पुनरावृत्ती होत आहे का, असा प्रश्न विचारला असता पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले की, काँग्रेस पक्ष आपल्या आधीच्या चुकांमधून शिकून पुढे वाटचाल करत आहे. तसेच इंडिया आघाडीच्या स्थापनेमधून हेच दिसून येत आहे, असे पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.

यावेळी मुख्यमंत्रिपदाच्या चेहऱ्यावरून महाविकास आघाडीमध्ये सुरू असलेल्या तिढ्याबाबत पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, जो पक्ष सर्वात मोठा पक्ष ठरतो, त्या पक्षाचा मुख्यमंत्री बनतो, अशी महाराष्ट्रामध्ये परंपरा राहिलेली आहे. २०१९ मध्ये उद्धव ठाकरे यांनाही याच फॉर्म्युल्यानुसार मुख्यमंत्री बनवण्यात आलं होतं. त्यावेळी महाविकास आघाडीमध्ये शिवसेना सर्वात मोठा पक्ष होता. आता मुख्यमंत्रिपदाबाबत काँग्रेसचं नेतृत्व आणि राहुल गांधी यांना निर्णय घ्यायचा आहे. महाराष्ट्रामध्ये विरोधी पक्ष मुख्यमंत्र्यांचा चेहरा समोर ठेवून निवडणुकीच्या रिंगणात उतरत नाही.

दरम्यान, महाविकास आघाडीमधील मतभेदांबाबत अधिक भाष्य करताना पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, आम्ही किमान समान जाहीरनामा आणि निवडणुकीसाठी समान रणनीतीसह निवडणुकीच्या मैदानात उतरू आणि निवडणूक जिंकू. तर जागावाटपाबाबत पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितलं की, मागच्या निवडणुकीत काँग्रेसचा स्ट्राईक रेट चांगला राहिला होता. महाविकास आघाडीमध्ये आधी आम्ही कनिष्ठ सहकारी म्हणून आलो होतो. मात्र आता समिकरणं बदलली आहेत, याची जाणीवही त्यांनी करून दिली.

## रोहित पवार बैठकीत मोबाईल, बाटल्या, चाव्या फेकून मारतात; राम शिंदेंचा खळबळजनक आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नगर १३**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्या कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघात सत्ताधारी महायुतीकडून जोरदार मोर्चेबांधणी सुरू असून मागील काही दिवसांत रोहित पवारांच्या काही सहकाऱ्यांनी त्यांची साथ सोडत भाजप आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. त्यामुळे भाजप नेते आणि विधानपरिषद आमदार राम शिंदे यांची ताकद वाढल्याचं बोललं जात आहे. अशातच आमदार शिंदे यांनी रोहित पवारांवर हल्लाबोल करत ते हुकूमशाही पद्धतीने कारभार करत असल्याचा आरोप केला आहे.



रोहित पवारांवर आरोप करताना राम शिंदेंनी म्हटलंय की, रोहित पवार यांनी आपल्या सोबतच्या कार्यकर्त्यांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली. त्यांची काम करण्याची पद्धत लोकांना पटलेली नाही. रोहित पवार यांच्या वर्तणुकीमध्ये हुकूमशाही आहे, अरेरावी आहे. ते चालू बैठकीत मोबाईल, पाण्याच्या बाटल्या आणि चाव्या अशा वस्तू फेकून मारतात. मी जर आमदार झालो नसतो तर त्यांनी नक्कीच १०-२० लोकांना मारहाण केली असती. मी विधानपरिषद आमदार झाल्यामुळे त्यांचा पारा अर्ध्यावर आल्याचं लोकांकडून सांगितलं जात आहे, असा दावा शिंदे यांनी केला आहे.

## पोलिसांचे कौतुक करावेसे वाटते एन्काउंटर करुन चांगलेच केले; शर्मिला ठाकरे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५मुंबई**



राज्याला हादरवून टाकणाऱ्या बदलापूरमधील खासगी शाळेतील लहान मुलीवरील अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा अचानक पोलिसांशी झालेल्या चकमकीत मृत्यू झाला. या खळबळजनक घटनेमुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. या प्रकरणावरून विरोधकांनी महायुती सरकारवर टीका केली. यानंतर आता या प्रकरणावरून मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून, या सुनावणीत न्यायालाने पोलिसांना महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. यातच मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे यांनी या एन्काउंटरचे समर्थन केले आहे.

शर्मिला ठाकरे यांनी अक्षय शिंदे चकमक प्रकरणात जखमी पोलीस निलेश मोरे यांची भेट घेतली. यानंतर मीडियाशी बोलताना शर्मिला ठाकरे म्हणाल्या की, मला एक मेसेज आला आहे. तो वाचून दाखवते. एन्काउंटर केल्याबद्दल पोलिसांचे अभिनंदन. जाणूनबुजून एन्काउंटर केले असेल, तर पोलिसांचे डबल अभिनंदन. ते एन्काउंटर कसेही असले, तरी महिलांवर अत्याचार एवढे वाढले आहेत की, जोपर्यंत कायद्याचा असा धाक निर्माण होत नाही, तोपर्यंत अशा गोष्टींवर वचक बसणार नाही. असे एन्काउंटर वरचेवर झाले पाहिजेत, असे माझे मत आहे, असे शर्मिला ठाकरे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.

**पोलिसांचे खास अभिनंदन करण्यासाठी आले**

पोलिसांचे खास अभिनंदन करण्यासाठी आले आहे. मी कोणत्याही राजकीय पक्षाची व्यक्ती किंवा राज ठाकरे यांची पत्नी म्हणून बोलत नाही. मी एक महिला म्हणून बोलत आहे. मी तमाम महिलांच्या बाजूने बोलते आहे. आमच्यात इतकी असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. दररोज अशा प्रकारच्या हिंसाचाराच्या घटना घडत आहेत. अत्याचार, खून वाढले आहेत. त्यामुळे महिलांची प्रतिनिधी म्हणून बोलते. राजकारणी काय बोलतात, विरोधक काय बोलतात, न्यायालय काय म्हणते, मला त्याच्याशी काही देणेघेणे नाही. मला पोलिसांचे कौतुक करावेसे वाटते, पोलिसांनी एन्काऊंटर करून चांगलेच केले, असे स्पष्ट मत शर्मिला ठाकरे यांनी व्यक्त केले.

## भाजपला नगरी धक्का! पिचड पितापुत्रांनी घेतली शरद पवारांची भेट; तुतारी हाती घेणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ नगर**

राज्यात विधानसभा निवडणुकांची घोषणा लवकरच होणार आहे. त्याआधी फोडाफोडीच्या राजकारणाने वेग घेतला आहे. तसेच नेतेमंडळींकडून सेफ पक्षाचा शोध घेतला जात आहे. तिकीट मिळण्याची शक्यता दिसत नसल्याने दुसऱ्या पक्षांकडे चाचपणी सुरू झाली आहे. यात दिग्गज नेतेही मागे नाहीत. नगर जिल्ह्यात या संभाव्य पक्षांतराची चर्चा सुरू झाली आहे. महायुतीतील नेते महाविकास आघाडीत त्यातही शरद पवार गटात जाण्यात जास्त इच्छुक दिसत आहेत. यातच आता भाजपला धक्का देणारी नगर जिल्ह्यातून बातमी आली आहे.



अविभाजित राष्ट्रवादी काँग्रेसमधील पूर्वाश्रमीचे दिग्गज नेते माजी मंत्री मधुकरराव पिचड आणि त्यांचे पुत्र माजी आमदार वैभव पिचड सध्या भाजपात आहेत. मात्र पितापुत्राची ही जोडी लवकरच तुतारी हाती घेतील अशी चर्चा सुरू झाली आहे. यामागे कारणही तसंच आहे. मधुकर पिचड आणि वैभव पिचड या दोघांनीही राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली. या भेटीची चर्चा राज्याच्या राजकारणात सुरू झाली आहे. बदलत्या राजकीय परिस्थितीचा विचार करून पिचड यांनी पुन्हा राष्ट्रवादीत येण्याची इच्छा व्यक्त केली आहे.राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष मधुकर पिचड आणि त्यांचे चिरंजीव वैभव पिचड यांनी शरद पवार यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतल्याची माहिती मिळत आहे. दोन्ही पितापुत्रांनी जवळपास अर्धा तास शरद पवार यांच्याबरोबर चर्चा केली. या भेटीत तिघांमध्ये नेमकी काय चर्चा झाली याची माहिती अजून तरी मिळालेली नाही. मात्र आगामी निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर पुन्हा राष्ट्रवादीत प्रवेश करण्याबाबत यावेळी चर्चा झाली असावी असे समजते.

## २ महिने राहिले, राज्यात सरकार बदलल्याशिवाय आता स्वस्थ बसणार नाही; शरद पवारांचा निर्धार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ विदर्भ प्रजसत्ताक**

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शरद पवारांच्याराष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाण्याची इच्छा अनेकांनी बोलून दाखवली आहे. भाजपासह महायुतीतील अनेक नेत्यांचा शरद पवार गटात प्रवेश झाला असून, ही मालिका कायम असल्याचे पाहायला मिळत आहे. परळी तालुक्यातील सक्रिय कार्यकर्ते राजेभाऊ फड यांनी आज शरद पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला आहे.

राष्ट्रवादीतील फुटीनंतर परळीचे आमदार असलेल्या धनंजय मुंडे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना साथ दिली. त्यामुळे या मतदारसंघात शरद पवार हे नवीन चेहऱ्याच्या शोधात असून इतर पक्षातील नेत्यांना आपल्याकडे खेचण्यासाठी प्रयत्नशील आहेत. या पार्श्वभूमीवर राजेभाऊ फड यांना पक्षात घेत शरद पवार यांनी धनंजय मुंडे यांच्याविरोधात मोर्चेबांधणी करण्यास सुरुवात केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. राजेभाऊ फड हे कन्हेरवाडी गावचे सरपंच आहेत. परळी विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीतर्फे निवडणूक लढवण्यास ते इच्छुक आहेत, असे म्हटले जात आहे.




यातच राज्यात सरकार बदलल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, असा निर्धार शरद पवारांनी बोलून दाखवला आहे.

सत्ता लोकांसाठी वापरायची असते, तुमच्या भागात सत्तेचा दुरुपयोग केला जातो. त्यावर कोणी आवाज उठवतो, त्याचा आवाज दाबला जातो. राजकारण हे समाजकारणाला स्थान देणारे पाहिजे. येथील चित्र बदलत आहे. लोकसभा निवडणुकीत तेच दिसले. देशाचे पंतप्रधान सांगत होते, आम्ही ४०० पार निवडून येणार, पण त्यांचे किती खासदार आले. राष्ट्रवादी काँग्रेसने १० जागा लढवल्या, त्यापैकी ८ जागा जिंकून आणल्या. आमच्या नावावर निवडून आले आणि मग भाजपासोबत सत्तेत जाऊन बसले, लोकांची फसवणूक या लोकांनी केली आणि सत्तेमध्ये सहभागी झाले. ही तर फक्त सुरुवात आहे. परळीमध्ये मोठी सभा आपण घेऊ आणि दाखवून देऊ. आता फक्त दोन महिने राहिले आहेत. राज्यात सरकार बदलल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, असे शरद पवार म्हणाले.

## रेल्वे घातपात रोखण्यासाठी एनआयए, राज्यांशी चर्चा; रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे वक्तव्य

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५ जयपूर**

घातपाती कारवायांद्वारे रेल्वे अपघात घडविण्याच्या प्रकारांना रोखण्यासाठी केंद्र सरकार विविध राज्यांची सरकारे, पोलिस, एनआयएशी चर्चा करत असल्याची माहिती केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.



त्यांनी जयपूर विमानतळावर मंगळवारी पत्रकारांना सांगितले की, आगामी काळात रेल्वे दुर्घटना घडवून आणण्यासाठी केल्या जाणाऱ्या घातपाती कारवाया रोखणे आवश्यक आहे. दोषींवर अतिशय कठोर कारवाई होईल. रेल्वे अपघात घडविण्यासाठी काही लोक प्रयत्न करीत आहेत.

**कवच यंत्रणेची चाचणी**

रेल्वे अपघात टाळण्यासाठी तयार केलेल्या कवच या स्वयंचलित यंत्रणेच्या कार्यक्षमतेची रेल्वेमंत्री वैष्णव यांच्या उपस्थितीत मंगळवारी सवाई माधोपूर येथे यशस्वी चाचणी पार पडली. कवच बसविलेल्या इंजिनमधून रेल्वेमंत्र्यांनी प्रवास केला. त्यावेळी कवचची चाचणी झाली.

## मालमत्ता कर घ्या हो साहेब!

### चंदू खेडकर यांचे झोन कार्यालय लक्षवेधी आंदोलन : घर टॅक्स वसुली कर्मचारी संभ्रम अवस्थेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २५ अमरावती**

अमरावती महानगरपालिका परी क्षेत्र मध्ये प्रहार संघटक चंदू खेडकर यांचे झोन क्रमांक एक मध्ये निवासस्थान आहे माझ्या निवासस्थानाचा असलेला महानगरपालिकेचा मालमत्ता कर भरण्याकरता आज खेडकर महानगरपालिका क्षेत्रीय कार्यालय क्रमांक एक मध्ये गेले होते मात्र संबंधित कर वसुली लिपिकाने कर घेण्यास नकार दिला कुठल्या पद्धतीने कर घेऊ असा तो लिपिक चंदू खेडकर यांना विचारत होता.



शहरातील अनेक राजकीय पुढाऱ्यांनी मालमत्ता कर आता जुन्याच पद्धतीने भरावा लागणारे असे होर्डिंग लावत जाहीर केले मात्र महानगरपालिका कर्मचारी अजूनही संभ्रमात आहे.की टॅक्स कोणत्या पद्धतीने घ्यायचाया वेळी खेडकर म्हणालेत की जी पद्धत तुमची असेल त्या पद्धतीने घ्या मोठमोठ्या जाहिराती मोठमोठ्या पत्र शासनाचे वृत्तपत्रांमध्ये वृत्तवाहिन्यांमध्ये आले त्यामुळे जे तुम्हाला साजेसे वाटेल त्याप्रमाणे कर घ्यावा परंतु आज तारखेपर्यंतचा पूर्ण कर माझ्या मालमत्तेचा घेण्यात यावा असा मी त्यांना आग्रह धरला परंतु दुपार पर्यंत क्षेत्रीय कार्यालय क्रमांक एक मध्ये माझा कर भरल्या गेलेला नाही तरी माझा मालमत्ता क्रमांक १३ ७१/१ असून महानगरपालिकेने संबंधित मालमत्ता कर भरून न घेतल्यास मी महानगरपालिकेचा तक्रार पोलीस स्टेशन गाडगे नगर मध्ये रीतसर तक्रारदेणार असल्याचे खेडकर म्हणाले. त्यामुळे आता महानगर पालिकेचे कर वसुली चे अधिकारी व कर्मचारी कोणत्या नियमानुसार खेडकर यांच्या कडून टॅक्स घेतात त्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## संपादकीय ......

# केजरीवालांचा जुगार


*मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देऊन पुन्हा जनतेकडे कौल मागणारे अरविंद केजरीवाल हे देशातील एकमेव मुख्यमंत्री असावेत. शेकडो कोटी रुपयांच्या मद्य घोटाळ्याच्या आरोपावरून त्यांच्यावर ईडी आणि सीबीआयकडून चौकशी चालू आहे. तब्बल १७७ दिवस तिहारच्या तुरुंगात काढल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने त्यांची जामिनावर मुक्तता केली आणि जेलमधून बाहेर पडताच त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा दोन दिवसांत राजीनामा देणार असल्याची घोषणा केली. दि. १७ सप्टेंबरला त्यांनी दिल्लीचे उपराज्यपाल विनय सक्सेना यांची भेट घेऊन मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा सुपूर्द केला आणि आम आदमी पक्षाच्या दिल्ली विधिमंडळ पक्षाच्या आमदारांनी आतिशी यांची एकमताने नेता म्हणून निवड केल्याचे पत्रही उपराज्यपालांना दिले. केजरीवाल यांनी आपला वारस म्हणून आतिशी यांना पसंती दिली. आता अरविंद केजरीवाल हे माजी मुख्यमंत्री आहेत, सरकारमध्ये ते कोणत्याही पदावर नाहीत, हरियाणाच्या विधानसभा निवडणुकीत ते आपच्या उमेदवारांच्या प्रचारात भाग घ्यायला ते मोकळे आहेत. तसेच दिल्ली विधानसभेची निवडणूक महाराष्ट्राबरोबर नोव्हेंबर महिन्यात घेण्यात यावी, अशी त्यांनी निवडणूक आयोगाकडे मागणी केली आहे. मी गुन्हेगार आहे की प्रामाणिक आहे, हे दिल्लीतील जनतेने ठरवावे. मी दोषी आहे की निरपराध आहे, हे दिल्लीतील मतदारांनी निवडणुकीत सांगावे अशी त्यांनी भूमिका मांडली आहे. मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देऊन जनतेकडे कौल मागण्यासाठी त्यांनी जुगार खेळला आहे. १७ सप्टेंबरला पंतप्रधान नरेंद्र मोदींचा ७४ वाढदिवस होता, त्याच दिवशी केंद्रातील एनडीए सरकारला १०० दिवस पूर्ण झाले. तोच दिवस निवडून केजरीवाल यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला व देशभरात मीडियामध्ये ठळक प्रसिद्धी मिळवली.*

*राजकारणात सत्ता हे सर्वस्वी असते. ज्यांना सत्ता मिळते, त्यांना मुख्यमंत्रीपद हे सर्वस्व वाटत असते. मुख्यमंत्रीपदासाठी दुसरे कोण स्पर्धक नकोत म्हणून प्रत्येक राजकीय नेता सतर्क असतो. मुख्यमंत्रीपदासाठी सर्व पैसा, प्रतिष्ठा व ताकद पणाला लावणारे अनेक आहेत. मुख्यमंत्रीपद मिळावे म्हणून हायकमांडला साकडे घालतात, पक्षाच्या आमदारांना आमिषे दाखवतात, आमदार दुसरीकडे जाऊ नयेत म्हणून त्यांना दुसऱ्या राज्यात नेऊन रिसॉर्ट किंवा पंचतारांकित हॉटेलवर नेऊन ठेवतात. पण आपल्या पाठीशी पक्षाचे भक्कम बहुमत असतानाही मुख्यमंत्रीपदाचा त्याग करणारे अरविंद केजरीवाल देशात एकमेव नेता असतील. केजरीवाल यांच्या निर्णयाने पक्षाला पुन्हा तेज येईल, कार्यकर्ते सक्रिय होतील, पक्षाला आलेली मरगळ झटकली जाईल, ज्या दिल्लीकरांनी लोकसभा निवडणुकीत दिल्लीतील सर्व ७ जागांवर भाजपाला निवडून दिले, ते मतदार विधानसभा निवडणुकीत पुन्हा आपकडे आकर्षित होतील, अशी गणिते मांडली जात आहेत.मद्य घोटाळ्यातील आरोपी असणारे केजरीवाल यांनी खरे तर ईडीने अटक केल्यावरच राजीनामा द्यायला हवा होता. रांचीमध्ये हेमंत सोरेन यांच्याकडे ईडीची तुकडी धडकली तेव्हा लगेचच झारखंडच्या मुख्यमंत्रीपदाचा त्यांनी राजीनामा दिला होता, मग जेलमध्ये गेल्यावरही केजरीवाल सहा महिने मुख्यमंत्रीपदाला का चिकटून राहिले? केजरीवाल यांना मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीचा मोह सुटत नाही असा त्यातून संदेश गेला. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत अँटी इन्कबन्सीचा फटका बसू नये म्हणून केजरीवाल यांनी जेलमधून बाहेर येताच मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्याची धूर्त खेळी खेळली आहे. सर्वोच्च न्यायालयाने केजरीवाल यांची जामिनावर सुटका केली असली तरी त्यांच्यावर काही कडक निर्बंध लादले आहेत. ते मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात जाऊ शकत नाहीत, मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीवर बसू शकत नाहीत. मुख्यमंत्री म्हणून कोणत्याही फाईलवर स्वाक्षरी करू शकत नाहीत. शेवटी मुख्यमंत्रीपद कागदावरच राहणार असेल तर त्याचा उपयोग तरी काय ? लोकसभा निवडणुकीत देशपातळीवर भाजपाप्रणीत एनडीएची फार मोठी घसरण झाली आहे. महाराष्ट्रात एनडीएच्या खासदारांची संख्या २३ ने घटली आहे, झारखंडमध्ये ९ तर हरियाणात ५ खासदार कमी झाले आहेत. आम आदमी पक्षाच्या विस्ताराची हीच योग्य वेळ आहे, असे केजरीवाल यांना वाटत असावे. या तिन्ही राज्यांत विधानसभा निवडणुकीत केजरीवाल प्रचाराला आता सक्रिय राहू शकतील. दिल्ली महापालिकेच्या एकूण २५० जागा आहेत, पैकी १३४ जागांवर आम आदमी पक्षाने विजय मिळवला आहे. आता केजरीवाल यांचे लक्ष्य पुन्हा दिल्ली विधानसभा आहे.४३ वर्षांच्या आतिशी या तात्पुरती व्यवस्था म्हणून मुख्यमंत्री झाल्या आहेत. सन २०२० मध्ये कालकाजी मतदारसंघातून त्या आपच्या आमदार म्हणून निवडून आल्या. २०२३ मध्ये मंत्री झाल्या व २०२४ मध्ये मुख्यमंत्री झाल्या. केजरीवाल यांच्याशी त्या निष्ठावान आहेत. काँग्रेसने मात्र केजरीवालांची बाहुली अशी टीका आतिशी यांच्यावर केली आहे. केंद्रातील भाजपा सरकारने केजरीवाल यांना मुख्यमंत्री असताना नेहमीच उपराज्यपालांच्या नियंत्रणाखाली ठेवले होते.नोकरशहांच्या नेमणुका व बदल्यांचे सर्व महत्त्वाचे अधिकार हे उपराज्यपालांना केंद्राने दिले आहेत. केजरीवाल यांचे हात केंद्राने बांधून ठेवले होतेच. आता मुख्यमंत्रीपदावर आलेल्या आतिशी वेगळे काय करू शकणार?दिल्लीची लोकसंख्या दोन कोटींवर गेली आहे. दिल्लीतील वाहनांची संख्या ८० लाखांवर पोहोचली आहे. दिल्लीचा मुख्यमंत्री हे प्रतिष्ठेचे पद असले तरी केंद्र सरकारने या पदाला फारच मर्यादित अधिकार दिले आहेत.*

# शेतात जाण्यासाठी रस्ता नाही मग कायदेशीर हक्काने तो कसा मिळवायचा?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ अमरावती** आपल्या शेतात जाण्या-येण्यासाठी शेत रस्ता, पाणंद रस्ते, गाडी मार्ग, पाऊल रस्ते अत्यंत महत्त्वाचे असतात. राज्यातील शेतजमिनीची मोजणी, जमीन महसुलाची आकारणी व प्रथम जमाबंदीची कार्यवाही १८९२ ते १९३० दरम्यान पूर्ण करण्यात आली आहे.




यानुसार शेतजमिनीचे भूमापन क्रमांकानुसार गाव नकाशे तयार करण्यात आलेले आहेत. भूमापन क्रमांकाचे गाव नकाशावर मूळ जमाबंदीच्या वेळचे विविध प्रकारचे रस्ते, गाडीवाट, पायवाट दर्शविलेले आहेत.

प्रमुख महामार्गापासून अथवा गावच्या रस्त्यापासून शेतकऱ्यांच्या शेतावर शेतीची विविध कामे करण्यासाठी जायचे असल्यास बहुतांश शेतीच्या भूमापन क्रमांकासाठी रस्ता नसतो. असा रस्ता कायद्याच्या चौकटीत राहून आपणास हक्काने मिळवता येतो.

यासंबंधी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम १४३ अन्वये नवीन रस्त्यासाठी आणि मामलेदार न्यायालय कायदा १९०६ चे कलम ५ (२) अन्वये वहिवाटीच्या वाटांचा वापर करण्यासाठी कोणताही अडथळा दूर करण्यासाठी अर्ज करून शेतरस्ता मिळवता येतो. शेतावर जाण्याच्या मार्गाच्या हक्काबाबत वाद निर्माण झाल्यास संबंधित शेतकऱ्यास तहसीलदारांकडे अर्ज करून दाद मागता येते. शेतजमिनीच्या भूमापन क्रमांकामधील व्यक्तींनी इतर भूमापन क्रमांकाची सीमा ओलांडण्याचा अधिकार प्राप्त करण्यासाठी केलेला दावा तहसीलदार तपासून त्याचा योग्य निर्णय देऊ शकतात.

तहसीलदारांनी शेतकऱ्यांच्या शेतात वाजवी अथवा रास्त प्रवेशासाठी त्यांच्या गरजा लक्षात घेतल्या पाहिजेत. गाव रस्त्यालगतच्या प्रत्येक शेतकऱ्याने त्याची जमीन आणि गाव रस्ता यांची सीमा आखणी योग्य पद्धतीने करावी.

ग्रामीण रस्ते आणि हद्दीचे ग्रामीण रस्ते महाराष्ट्र जमीन महसूल कायदा १९६६ मधील कलम २० मधील तरतुदीनुसार शासनाच्या मालकीचे आहेत. भूमापन सीमेवरील हद्द व हद्दीच्या निशाण्या नष्ट करून जर एखादे शेतकऱ्याने रस्त्यात अतिक्रमण केले असेल तर महसूल अधिकाऱ्यांनी तातडीने कार्यवाही करणे जरुरी आहे.




## पोट कमीच होत नाही-पूर्ण शरीर बेढब झालं? नियमित २ पदार्थ पाण्यासोबत घ्या, झरझर घटेल चरबी

**विदर्भ प्रजासत्ताक**

वाढत्या वजनामुळे फक्त शरीराची सुंदरता कमी होत नाही तर अनेक गंभीर उद्भवू शकतात. डायबिटीस, हार्ट डिसीज फॅटी लिव्हर, गॉल ब्लॅडर, हाय ब्लड प्रेशर, स्लिप एपिनिया, स्ट्रोक, कॅन्सर आणि अस्थमा यांसारख्या आजारांचा धोका वाढतो. वाढत्या वजनामुळे मानसिक आरोग्यावरही नकारात्मक परिणाम होतो. ज्यामुळे डिप्रेशन, चिंता यांसारख्या समस्या वाढतात.


अधिकाधिक महिलांच्या मनात हा प्रश्न असतो की वजन कमी करण्यासाठी कोणकोणते उपाय करायला हवेत. जर तुम्ही वजन कमी करण्यासाठी काही फूड्स शोधत असाल तर ३ आयुर्वेदीक फूड्सचा आहारात समावेश करून तुम्ही शरीर चांगले ठेवू शकता. आयुर्वेदीक डॉक्टर ऐश्वर्या संतोष यांनी इंस्टाग्रामवर काही उपाय शेअर केले आहे. या पौष्टीक पदार्थांचा आहारात समावेश करून तुम्ही वेट लॉस जर्नी सुरू ठेवू शकता.

एक्सपर्ट्सच्या म्हणण्यानुसार आजकाल अन्हेल्दी खाण्यापिण्याच्या सवयी, बसून काम करणं, व्यायामाची कमतरता यामुळे लोक लठ्ठपणाचे शिकार होत आहेत. लठ्ठपणामुळे आरोग्याच्या इतर समस्या उद्भवू शकतात. यासाठी लठ्ठपणापासून सुटका मिळवण्यासाठी डाएट आणि फिटनेसकडे लक्ष द्यायला हवं. आहारात थोडा बदल करून तुम्ही पोषक तत्वांची कमतरता भरून काढू शकता.

**जवसाने वजन करा कमी**

जवसात फायबर्सचे प्रमाण जास्त असते ज्यामुळे पचनक्रिया चांगली राहते आणि भूक कंट्रोल होण्यासही मदत होते. यात कमी कॅलरीज असतात ज्यामुळे वजन कमी करण्यास मदत होते. कोलेस्टेरॉल कमी करण्यास मदत होते जे आरोग्यासाठी उत्तम ठरते. याचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असतो ज्यामुळे ब्लड शुगर लेव्हल नियंत्रणात राहते.

**वजन कमी करण्यासाठी जवसाचे सेवन कसे करावे** – जवस तुम्ही सूप किंवा सॅलेडमध्ये घालून खाऊ शकता. भाज्यांमध्ये जवस घालून हेल्दी खिचडी बनवू शकता. जवसाच्या पिठाचे



पराठेसुद्धा उत्तम लागतात. जवसाचा भात किंवा पुलाव, डोसा बनवून खाता येईल. जवस तांदळाप्रमाणे शिजवण्याआधी रात्री पाण्यात भिजवून ठेवा नंतर पाणी आणि १ चिमूट मीठासोबत शिजवा नंतर व्यवस्थित गाळून घ्या.

**मधाने वजन कमी होण्यास मदत होते**

मध नैसर्गिकरित्या गोड असते याचा वापर तुम्ही साखरेऐवजी करू शकता. यात कमीत कमी कॅलरीज असतात. ज्यामुळे मेटाबॉलिझम वाढतो आणि शरीर जास्त कॅलरीज बर्न करते. यामुळे भूक कंट्रोल होते आणि जास्त खाण्याची इच्छा कमी होते. मधात एंटीऑक्सिडेंट्स असतात जे शरीरारासाठी फायदेशीर ठरतात.

कोमट पाण्यात १ चमचा मध घालून दिवसाची सुरूवात करा. गरम पाण्यासोबत मध घेऊ नका पाणी कोमटच असावं. दह्यात चमचाभर मध मिसळून नाश्त्याला खाऊ शकता. आल्याच्या रसात मध मिसळून सकाळच्यावेळी याचे सेवन करू शकता.

# कमी वेळेत चांगले कुजलेले कंपोस्ट तयार करण्यासाठी वापरा ही सोपी पद्धत

**विदर्भ प्रजासत्ताक**

कंपोस्ट खत तयार करणे ही एक जीवशास्त्रीय प्रक्रिया असून तिच्यामध्ये व कुजलेल्या सेंद्रिय पदार्थांचे सूक्ष्म जेईईव्हीएएनयू मार्फत विघटन होते आणि कर्ब नत्र गुणोत्तर कमी होते.

अशा विघटन झालेल्या कंपोस्ट खतमधून शेण खताच्या तुलनेने अधिक प्रमाणात सेंद्रिय पदार्थ, मुख्य आणि सूक्ष्म अन्नद्रव्ये यांचा पुरवठा होतो. कंपोस्ट खत हे शेतातील टाकाऊ पदार्थ उदा. पिकांची धसकटे, तन, पिकांचे अवशेष, कापसाचे चिपाड, गोठ्यातील मूत्र शोषून घेतलेली माती इत्यादी पध्दतींचा वापर करून केल्या जाते.

**कंपोस्ट खत तयार करण्यासाठी महत्वाच्या बाबी**

१) बाष्प
२) तापमान
३) सेंद्रिय पदार्थ
४) कॅल्शियम फॉस्फेटचा वापर
५) कर्ब नत्र गुणोत्तर जीवाणू संवर्धनाचा उपयोग

कंपोस्ट खत तयार करण्यासाठीची ढीग पद्धत

– ढीग पध्दत या पध्दतीमध्ये सेंद्रिय पदार्थांचे विघटन हवेच्या सानिध्यात घडवून आणतात.

कृषी विशेष

– या पध्दतीमध्ये सेंद्रिय पदार्थांच्या ढीगांची लांबी २ मिटर पेक्षा जास्त, रूंदी २ ते २.५ मीटर आणि ऊंची सुमारे १.५ मीटर ठेवतात.

– ढीग वरच्या बाजूस निमुळता होत जाणारा रचावा. ढीगाची पृष्ठभागावरील रूंदी पाया पेक्षा २ फुट कमी असावी. ढीग पट्टा पध्दतीने रचावा.

– प्रथम सेमी जाडीचा कर्ब युक्त पदार्थांचा थर व त्यावर नत्र युक्त पदार्थांचा थर या क्रमाने १.५ मीटर उंची होईपर्यंत ढीग रचावा.

– या पध्दतीमध्ये पिकांचे अवशेष, शेण, मुत्रयुक्त माती, राख, पानी यांचा वापर करून खत तयार करावे.




– प्रत्येक थरावर पानी शिंपडावे, पृष्ठ भागावर पावसाचे पाणी धरून ठेवण्यासाठी थोडासा खोलगट भाग करून हा ढीग सर्व बाजूंनी माती व वाळलेले गवत यांनी झाकून टाकावा.

– त्यामुळे आतील उष्णता बाहेर जाणार नाही. २ ते ३ महिन्यानंतर सर्व थरातील पदार्थ पुन्हा खाली वर करून मिसळल्यास विघटन जलद होते.

– सुमारे ४ महिन्यात उत्तम सेंद्रिय खत तयार होते. ही पध्दत जास्त पावसाच्या व पाणथळ भागाममध्ये वापरावी.

– अशा पध्दतीने तयार केलेल्या कंपोस्ट खतामध्ये ०.७७% नत्र, ०.४४ % स्फुरद आणि ०.३८% पालाश असते.

कंपोस्ट खत तयार झाले की नाही हे तपासून घेण्यासाठी पुढील पद्धतीचा अवलंब करावा.

१) उत्तम कुजलेले खत रवेदार होते.

२) उत्तम कुजलेल्या सेंद्रिय पदार्थांचे आकारमान ६०% कमी होते तर वजन ४० टक्यांनी कमी होते.

३) खताचा रंग तपकिरी व गर्द काळा होतो.

४) खताची विशिष्ट घनता कमी होते.

५) खताचा मातकट वास येतो.

६) खताचे तापमान कमी होते.

# भगवान महावीरांच्या जीवनचरित्रावर निबंध स्पर्धेचे शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२ अकोला,** भगवान महावीर २५५० व्या निर्वाण कल्याण महोत्सवानिमित्त राज्य शासनामार्फत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात विविध शाळांतून निबंध स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री तथा महोत्सव समितीचे अध्यक्ष मंगलप्रभात लोढा यांनी यासंबंधी जिल्हा प्रशासनाला सूचना केल्या आहेत. त्यानुसार विविध सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्यानमाला, शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा घेण्यासाठी जिल्हास्तरीय समिती गठित करण्यात आली आहे. इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा होत असून, राज्यात २५.५० लाख रू. रकमेची बक्षीसे देण्यात येत आहेत. शिक्षणाधिका-यांनी स्पर्धेच्या आयोजनासाठी समिती सदस्य प्रवीण बिलाला व इतर सदस्यांशी संपर्क व समन्वय साधून शाळांतून हा उपक्रम यशस्वी करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी केले आहे.

# सूर्यग्रहणामुळे सर्वपित्री अमावस्येला श्राद्धविधी करता येणार की नाही? जाणून घ्या!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती –** पितृ पक्षाची समाप्ती सर्वपित्री अमावस्येला होते. ज्यांची श्राद्धतिथी आपल्याला माहीत नसते अशा सर्वांचे श्राद्धविधी सर्वपित्री अमावस्येला केले जातात. यंदा २ ऑक्टोबर रोजी सर्वपित्री अमावस्या आहे. त्याच दिवशी भाद्रपद मासाची समाप्ती आणि सूर्यग्रहण देखील आहे. यंदा पितृपक्षाची सुरुवात चंद्रग्रहणाने आणि शेवट सूर्यग्रहणाने होणार असल्याने अनेक विधी करण्याबाबत लोकांच्या मनात विविध शंका कुशंका उपस्थित झाल्या होत्या. पितृपक्ष संपत आले, पण आता सर्वपित्रीला श्राद्धविधी करायचे की नाही हा नवीन प्रश्न निर्माण झाला आहे, त्याचे उत्तर जाणून घेऊ.

ग्रहण काळ शुभ कार्यासाठी निषिद्ध मानला जातो शिवाय पितृ पक्षातही शुभ कार्य केली जात नाहीत. तर हा काळ केवळ श्राद्ध विधीसाठी आणि पितरांच्या स्मरणासाठी राखीव ठेवलेला असतो. यंदा सर्वपित्री अमावस्येला सूर्य ग्रहण असणार आहे. भले ते भारतातून दिसणार नसले, तरी ग्रहण काळ देवकार्यासाठी निषिद्ध मानला जातो. त्यामुळे या काळात श्राद्धविधी करावे की नाही, याबाबतीत ज्योतिष तज्ज्ञांचे मत जाणून घेऊ.

**सर्व पितृ अमावस्या कधी असते?**

हिंदू कॅलेंडरनुसार, अमावस्या तिथी १ ऑक्टोबर रोजी रात्री ९.४० मिनिटांनी सुरू होईल. सर्वपित्री अमावस्या तिथी २ ऑक्टोबर रोजी रात्री १२. १९ मिनिटांनी समाप्त होईल. म्हणजेच ही तिथी २ तारखेचा सूर्योदय पाहणार आहे म्हणून २ तारखेला सर्वपित्री अमावस्या धरली जाईल. तर, सूर्यग्रहण १ ऑक्टोबर रोजी रात्री ९.४० वाजता सुरू होईल आणि २ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री ३ वाजून १७ मिनिटांनी समाप्त होईल.




**सूर्यग्रहणामुळे सर्वपित्री अमावस्येला श्राद्ध करावे की नाही?**

सर्वपित्री अमावस्येला होणारे सूर्यग्रहण भारतात दिसणार नाही. हा ग्रहण काळ असल्याने शुभ कार्य वर्ज्य असेल परंतु श्राद्ध विधी करण्यास काहीच हरकत नाही असे शास्त्र सांगते. त्यामुळे ज्यांचे पितृपक्षात श्राद्धविधी करायचे राहून गेले असतील त्यांनी सर्वपित्रीला श्राद्धविधी करावे.

सर्वपित्री अमावस्येचे महत्व

पितृपक्षाचा शेवट सर्वपित्रीने होतो. या दिवशी सर्व पितरांच्या नावाने श्राद्ध विधी करता येतो. या दिवशी ज्यांच्या श्राद्धाची तारीख माहित नाही अशा कुटुंबातील सर्व सदस्यांच्या नावावरही श्राद्ध केले जाते. म्हणूनच त्याला सर्व पित्री असे म्हटले आहे. सर्वपित्री अमावस्येला श्राद्ध, पिंडदान आणि तर्पण वगैरे केल्याने पितरांचा विशेष आशीर्वाद प्राप्त होतो.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. २५ सप्टेंबर २०२४

शहर/ग्रामिण

## संपाचा आजचा दुसरा दिवस

# आरटीओ कर्मचारी संपावर ठाम








**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ अमरावती–** आकृतीबंधाची सुयोग्य अंमलबजावणी न करणे, कामकाजात सुसूत्रीकरण येण्यासाठी नेमण्यात आलेल्या कळस्कर समितीच्या हितकारक कार्यपद्धतीची अंमलबजावणी न करणे, विभागीय स्तरावरील आस्थापना विषयक ज्येष्ठता व बदल्याचें संयोजन याबाबत कोणतीही कर्मचारीभिमुक सकारात्मक कार्यवाही न होणे, यासह विविध मागण्यांसाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयांमधील (आरटीओ) कर्मचाऱ्यांनीमंगळवार २४ सप्टेंबर २०२४ पासून बेमुदत संप पुकारला आहे. अमरावतीमध्ये या आंदोलनात १४५ कर्मचारी सहभागी झाले असून आरटीओ कार्यालयाचे कामकाज पूर्णतः ठप्प झाले आहे. या आंदोलनामुळे शासनाचा एका दिवसाला सुमारे ५० कोटींचा महसूल बुडत आहे.वाहना संदर्भात दैनंदिन होणारे सर्व कामे – ठप्प पडल्याने शासनाला दर दिवसाला प्राप्त होणाऱ्या ५० कोटी रुपयांच्या वर महसुलापासून वंचित राहावे लागत आहे. एवढेच नाही तर राज्यातील आरटीओ कार्यालय तसेच राज्यात विविध ठिकाणी उभारलेल्या सीमा तपासणी नाके यावरील कर्मचारी सुद्धा संपावर गेल्याने कामकाजावर प्रचंड मोठा परिणाम पडला आहे.आरटीओ कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन पुकारल्याने मंगळवारला सकाळी कार्यालयाचे कुलूपच उघडण्यात आले नव्हते. त्यामुळे आरटीओ कार्यालयाचे कामकाज ठप्प झाले होते. कामानिमित्त आलेल्या लोकांना रिकाम्या हाताने परत जावे लागले.

# पेट्रोलपंपजवळ खड्डेच खड्डे, पाणी साचल्याने अपघाताची शक्यता

## जबाबदारी कुणाची ? आयआरबी की पेट्रोलपंप मालकाची



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ नांदगाव पेठ–** राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या कोल्हटकर पेट्रोलपंप जवळ पावसामुळे खड्डे पडल्याने अपघातांची शक्यता बळावली आहे. दुचाकीचालकांना पाणी साचलेल्या खड्ड्यांमुळे प्रचंड मानसिक त्रास होत आहे.बऱ्याच दिवसांपासून याठिकाणी खड्डे पडलेले असून अद्यापही याठिकाणी डागडुजी किंवा दुरुस्ती करण्यात आलेली नाही त्यामुळे दुरुस्ती करण्याची जबाबदारी नेमकी आयआरबी की पेट्रोलपंप मालकाची याबाबत प्रश्न उपस्थित होत आहे. राष्ट्रीय महामार्गावर अपघातांचे वाढलेले प्रमाण बघता वाहनचालकांच्या दृष्टीने सुरक्षा असणे अत्यंत महत्वाची बाब आहे.या मार्गावर असलेल्या अनेक पेट्रोलपंपाजवळ जड वाहनांमुळे खड्डे पडलेले आहेत.मात्र बऱ्याच ठिकाणी खड्ड्यांची डागडुजी न झाल्याने पेट्रोल भरण्यासाठी जाणाऱ्या वाहनचालकांना नाहक मानसिक त्रास सोसावा लागतो. नागपूर कडे जाणाऱ्या अधिकाधिक वाहनांचा कल कोल्हटकर पेट्रोलपंपावर जास्त असल्याने याठिकाणी वाहनांमुळे मोठमोठेखड्डे पडलेले असून त्यामध्ये पावसाचे पाणी साचलेले आहे. विशेष म्हणजे रात्रीच्या वेळी त्याठिकाणी कोणत्याही प्रकारची प्रकाश व्यवस्था नसल्याने दुचाकी वाहनांचा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याठिकाणी दोन वेळा अपघात देखील झाले आहेत त्यामुळे पेट्रोलपंप जवळ रस्ता सुरळीत असणे अत्यावश्यक आहे. महामार्गावरील सुरक्षा ही आयआरबीकडे असल्याने त्यांनीही या प्रकाराकडे लक्ष देणे गरजेचे आहे मात्र आयआरबी आणि पेट्रोलपंप मालक यांच्यात समन्वय नसल्याने सुविधांकडे दुर्लक्ष होत असून याचा परिणाम मात्र सर्वसामान्य वाहनचालकांना भोगावा लागत आहे. पेट्रोलपंप नजीकच्या खड्डे तातडीने बुजवण्यात यावे तसेच प्रकाश व्यवस्था सुरळीत करण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे

# उपमुख्यमंत्री अजित पवार उद्या येणार अमरावतीत



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती –** उप मुख्यमंत्री तथा वित्त, नियोजन मंत्री अजित पवार गुरुवार, २६ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता शहरात येणार आहेत. या दरम्यान अजित पवार यांच्या हस्ते नियोजन भवन येथे अमरावती विधानसभा मतदार संघातील विविध विकास कामांचे उद्घाटन करतील. प्रारंभी ते जीवन प्राधिकरण तपोवन परिसर येथे अमृत–२ वाढीव पाणी पुरवठा योजना प्रकल्पाच्या कोनशिलेचे अनावरण करतील. त्यानंतर छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण मानव विकास संस्था (सारथी) पुणे अधिनस्त, नक्सारी येथे विभागीय कार्यालय, वसतीगृह, अभ्यासिका इत्यादी बाबींच्या इमारतींचे भूमिपूजन तसेच अमरावती विधानसभा मतदार संघातील पश्चिम वळण रस्त्यावर लालखडी येथे रेल्वे क्रॉसिंगवर चौपदरी उड्डाणपुलाचे भूमिपूजन, डफरीन परिसरातील २०० खाटांच्या नवीन इमारतीची कोनशिला अनावरण यासह अन्य कामांचे भूमिपूजन होणार आहे, अशी माहिती आ. सुलभा संजय खोडके यांनी दिली आहे.

# परतवाडा – धारणी रस्त्याची पाहणी करून अहवाल सादर करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी दिले निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ अमरावती** सोमवारी मेळघाट कडे जाणारी सुसाट चावला ट्रॅव्हल्स या खाजगी बस चा सेमाडोह येथे बिशन अपघात झाला होता या अपघातात दोन महिला डॉ.सह चौघांचा दुर्देवी मृत्यू झाल्याने शासकीय यंत्रणा खळबळून जागी झाली आहे जिल्हाधिकारी सौरभ कटीयार यांनी या घटनेची बमभिर दखल घेत परतवाडा ते धारणी रस्त्याच्या सुरक्षेचे ऑडिट करण्याचे आदेश दिले आणि आठ दिवसात अहवाल मागितला.

सेमाडोह येथील पुलावरून खाजगी बस ४० ते ५० फुट खाली पडल्याने अमरावतीच्या महिला डॉ. प्रणाली रघुनाथ इंगळे (रा. गाडगेनगर), समुदाय आरोग्य अधिकारी पल्लवी राहुल इंगोलेकदम) यांच्यासह सेवानिवृत्त कर्मचारी राजेंद्र मोतीलाल पाल आणि फुलवंती राजू काजले यांचा घटनास्थळी मृत्यू झाला तर २६ प्रवाशी गंभीर जखमी झाले होते. या भिषण अपघातामुळे पोलीस व आरटीओ

### बस अपघात प्रकरण

विभाग चांगलाच खळबळून जागा झाला आणि दोन्ही विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना रुग्णालयात

दाखल केले. घटनेमुळे दोन्ही बाजूचा रस्ता सायंकाळपर्यंत बंद ठेवण्यात आला होता. त्यामुळे प्रवाशांची चांगलीच कोंडी झाली. प्रवाशांना रात्री ११ वाजतापर्यंत सेमाडोह येथ थांबावे लागले. परिणामी दोन्ही बाजूनी वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. याबाबत



जिल्हाधिकाऱ्यांनी घटनेची दखल घेत परतवाडा ते धारणी मार्गाची पुर्ण माहिती घेतली आणि मंगळवारी त्या मार्गाचे सुरक्षा ऑडिट करण्याचे आदेश दिले.

आरटीओ अधिकारी, पोलीस विभागीतील अधिकारी आणि बांधकाम विभागातील अधिकारी अशी त्रिसदस्यीय समिती गठित करण्यात आली. समितीतील अधिकारी लवकरच परतवाडा ते धारणी मार्गाची पूर्ण पाहणी करणार असून सुरक्षेच्या दृष्टीने कोणत्या उपाययोजना कराव्या लागणार, कोणती कामे करावी लागणार, अपघातस्थळार्च पाहणी करून अपघात टाळण्याकरिता कोणत्या उपाययोजन कराव्या लागणार, यासर्व बाबींची पाहणी करून आन दिवसात जिल्हाधिकाऱ्यांना अहवाल सादर करणार आहे.

# विदर्भाचा राजाच्या विसर्जन मिरवणुकीत दोन मंगळसूत्रासह पाच चेन लंपास

## बीड जिल्ह्यातील सहा चोर महिला जेरबंद





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ अमरावती –** गणपति फोटो इंसर्ट मध्ये घ्याल विदर्भाचा राजा विसर्जन मिरवणुकीदरम्यान एक नव्हेतर दोन महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्रांसह पाच पुरुषांच्या गळ्यातील सोनसाखळी लंपास करण्यात आल्याची घटना घडली. याप्रकरणी शहर कोतवाली पोलिसांनी गुन्हा नोंदवून चोरट्यांचा शोध सुरु केला.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुध्दा विदर्भाचा राजा गणपतीचे विसर्जन मोठ्या उत्साहात करण्यात आले. शहरातील हजारोच्या संख्येने नागरिक विसर्जन मिरवणुकीत सहभागी झाले होते. तसेच मिरवणुक पाहण्याकरिता नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी झालेली होती. दरम्यान रंगोली बारसमोर एक महिला लहान मुलीला कडेवर घेऊन मिरवणुक पाहण्याकरिता उभी होती. गणपती मिरवणुक पुढे गेल्यानंतर महिलेला गळ्यातील २१ ग्रॅमचे मंगळसुत्र (किमंत ७४ हजार रुपये) चोरी झालेले लक्षात आले. तीने कोतवाली ठाण्यात धाव घेतली. रेल्वे स्टेशन चौकातसुध्दा एक महिला मिरवणूक पाहण्याकरिता उभी असताना तिच्या गळ्यीतल लहान व मोठे दोन ८ ग्रॅमचे मंगळसुत्र (किंमत २३ हजार रुपये) चोरी गेले. संतोष कृष्णराव आर्वीकर (वय ४८ रा. गाडगेनगर) हे राजकमल चौकात गणपती आरती करीत उपस्थित असताना त्यांच्या गळ्यातील २० ग्रॅमची सोन्याची चेन (किंमत ५० हजार रुपये) कोणीतरी लंपास केली. पुनम हरिशंकर मिश्रा (वय ३०) यांच्या गळ्यातील १२ ग्रॅमची सोन्याची चेन (किंमत ३५ हजार रुपये) लंपास केली. विशाल नांदुरकर (वय २८) यांच्या गळ्यातील २० ग्रॅमची सोन्याची चेन (किंमत ५० हजार रुपये) तसेच आकाश पाचंगे (वय ३२) यांच्या गळ्यातील १५ ग्रॅमची सोन्याची चेन (किंमत ४० हजार) तर हर्षद देशमुख (वय ३०) यांच्या गळ्यातील ८ ग्रॅम चांदीची चेन (किमंत २० हजार रुपये) अनोळखी चोरट्यानी उडविली. हा प्रकार एका पाठोपाठ निदर्शनास येताच चांगलाच गोंधळ उडाला. त्या सर्वांनी कोतवाली ठाण्यात धाव घेतली. तेव्हा पोलिसांनी गुन्हे दाखल करुन चोरट्यांचा शोध सुरु केला

# संशोधन विस्तारासाठी कार्यशाळा आवश्यक – प्रा.हेमंत देशमुख

## भारतीय कृत्रिम दंतशास्त्र संघटनेच्या कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती–** कोणत्याही क्षेत्रात संशोधन व अभ्यास करण्यासाठी मार्गदर्शनाची आवश्यकता असते. कार्यशाळेतून संशोधन विस्तारासाठी मदत होते असे प्रतिपादन प्रा. डॉ.हेमंत देशमुख यांनी केलेइंडियन सोसायटी कृत्रिम दंतशास्त्र संघटनेच्या नागपूर विभागीय शाखेची कार्यशाळा व संघटनेचा पदस्थापना कार्यक्रम दि. २१ सप्टेंबर २०२४ रोजी अमरावती येथे आयोजित करण्यात आला.विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीचे कोषाध्यक्ष डॉ.प्रा. हेमंत देशमुख हे या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून उपस्थित होते. अशा कार्यशाळा कौशल्याच्या उन्नतीसाठी व संशोधन विस्तारासाठी तसेच आधुनिक तंत्रज्ञान समाजातील गरजू लोकान पर्यंत कमी खर्चात पोहोचावे असे प्रा. हेमंत देशमुख आपली मनोगता मध्ये व्यक्त केले. विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी अश्या कार्यात मदतीस नेहमीच तयार असते.

अत्याधुनिक दंत उपचार पद्धती व डेंटल इम्प्लांट, इम्प्लांट दंत रोपण या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले यात मान्यता प्राप्त दंत तज्ञ सुविख्यात डॉ. भूषण वानखेडे, व्ही. वाय. डब्ल्यू. एस. दंत महाविद्यालय व रुग्णालय येथील डॉ. विनय कोठारी, नागपूर व डॉ. राहुल टेकाळे यांनी दंत उपचार पद्धतींवर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेला मध्य भारतातून भरगच्च प्रतिसाद लाभला. या प्रसंगी डॉ. प्रा. हेमंत देशमुख यांच्या हस्ते वार्षिक विज्ञान जर्नल चे प्रकाशन करण्यात आले. शेकडो विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे व नवनवीन विषयावर प्रस्तुत परिसंवाद, वैज्ञानिक सत्र, प्रशिक्षण कार्यक्रम यात कृत्रिम दंतवैद्यक शास्त्रातील प्रशिक्षीकांनी सहभाग घेतला व या प्रसंगी अभिनव प्रात्यक्षिके, अत्याधुनिक संगणकीकृत डिजिटल तंत्रज्ञान कृत्रिम दंतशास्त्र विषयक प्रिंट व डिजिटल अशा दोन्ही रूपात नियतकालिक जर्नल उपलब्ध करण्यात आली संपूर्ण महाराष्ट्रातील प्रशिक्षनार्थ्यांचा यांचा सहभाग असलेली ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली.याप्रसंगी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ कुलसचिव श्री. असनारे सर व जेष्ठ ओरल सर्जन डॉ. डी. जी. अडवणी यांचा सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाला वि. यु. वे. सो. संचालित दंत महाविद्यालय व रुग्णालयाचे अमरावती चे शिक्षक वृंद विद्यार्थी व या कार्यशाळेला रणजीत देशमुख दंत महाविद्यालय नागपूर, शरद पवार दंत महाविद्यालय वर्धा, शासकीय दंत महाविद्यालय, नागपूर यांचा सहभाग होता.

# शिष्यवृत्तीअभावी विद्यार्थ्यांची कागदपत्रे अडवता येणार नाही

## प्रादेशिक उपायुक्तांच्या सुचनेनंतर सहायक आयुक्तांचे महाविद्यालयांना आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ अमरावती–** शैक्षणिक अडचणी निर्माण केल्यास कार्यवाही करण्यात येईल, असे पत्र समाज कल्याण विभागाच्या अकोला, अमरावती, वाशिम, बुलढाणा व यवतमाळ या पाचही जिल्ह्यातील सहाय्यक आयुक्तांनी त्यांच्या स्तरावरून सर्व महाविद्यालयांना निर्गमित करण्याचे आदेश समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त सुनील वारे यांनी दिले आहेत. लाखो विद्यार्थ्यांना याचा दिलासा मिळणार आहे.व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमातील विविध शाखेत प्रवेशित विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्तीद्वारा शिक्षणाचा मोफत लाभ घेता येतो. त्यामुळे शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांना कुठल्याही प्रकारच्या प्रवेश शुल्काचा भरणा करावा लागत नाही. परंतु निर्णयामध्ये २०२१ मध्ये बदल झाला असून राज्य सरकारतर्फे ४० टक्के व केंद्र सरकारतर्फे ६० टक्के लाभ देण्यात येतो. राज्याचा लाभ थेट महाविद्यालयात जमा होतो परंतु केंद्राचा दुसरा हफ्ता ६० टक्के लाभ हा थेट आधार सलंगनित विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा होतो त्यामधून




विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता वगळून उर्वरित फी महाविद्यालयात जमा करायची आहे, असे नियमानुसार प्रयोजन आहे. परंतु शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यास विलंब होत असल्याने विविध शाखेतील अभ्यासक्रम पूर्ण झालेले विद्यार्थी उर्वरित ६० टक्के रक्कम व स्वत:जवळून भरण्यासाठी आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्याने त्यांचे शैक्षणिक वर्ष पूर्ण झालेले असतानासुद्धा त्यांना पुढील प्रवेशासाठी व मूळ कागदपत्रांसाठी महाविद्यालयात येरझारा कराव्या लागतात. विविध अडचणींना सामोरे जावे लागते. जाचक नियमामुळे लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य अंधारात आले आहे. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची कुठल्याही प्रकारची कागदपत्रे व प्रवेश शिष्यवृत्तीअभावी अडवू नये, असा स्पष्ट शासन निर्णय असतानासुद्धा शासन निर्णयाला महाविद्यालय स्तरावरून केराची टोपली दाखविण्याचे काम सुरू आहे.परिणामी विद्यार्थ्यांना नाहक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषदेचे अकोला जिल्हाध्यक्ष तथा विदर्भ सरचिटणीस आकाश हिवराळे यांच्या नेतृत्वात १३ सप्टेंबर २०२४ ला प्रादेशिक उपायुक्तांना निवेदन देण्यात आलेले होते. त्या निवेदनाची दखल घेत प्रादेशिक उपायुक्तांनी सहायक आयुक्तांना महाविद्यालयांना पत्र निर्गमित करण्याचे आदेश दिले आहेत.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या खात्यात जमा होणाऱ्या शिष्यवृत्तीमधील निर्वाह भत्ता वगळून उर्वरित शिष्यवृत्ती महाविद्यालयात जमा करावी, असे आवाहन रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषदेचे आकाश हिवराळे यांनी केले आहे.

## अक्षय शिंदेचा मृत्यूचा नेमका कशामुळे, पोस्टमार्टेम रिपोर्टमध्ये काय?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ मुंबई –**

पोलीस एन्काऊंटमध्ये मारल्या गेलेल्या अक्षय शिंदेच्या मृत्यूचे नेमके कारण समोर आले आहे. अक्षय शिंदेचा शवविच्छेदन समोर आला असून, त्यातून पोलिसांनी झाडलेली गोळी अक्षय शिंदे कुठे लागली, हेही समोर आले आहे.

अक्षय शिंदेला तळोजा कारागृहातून बदलापूर नेण्यात येत होते. मुंब्रा येथे झालेल्या पोलीस एन्काऊंटरमध्ये त्याचा मृत्यू झाला. अक्षय शिंदेला कुठे गोळी लागली होती, याबद्दल पोलिसांनी कोणतीही माहिती दिली नव्हती. ती पोस्टमार्टेम रिपोर्टमधून समोर आली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अक्षय शिंदेच्या डोक्यात गोळी मारण्यात आली होती. अति रक्तस्राव झाल्याने त्याचा जागेवरच मृत्यू झाला. अक्षय शिंदेचा पोस्टमार्टेम रिपोर्ट मुंब्रा




पोलिसांना सुपूर्द करण्यात आला आहे. अक्षय शिंदेच्या मृतदेहाचे शवविच्छेदन मंगळवारी (२४ सप्टेंबर) करण्यात आले. तब्बल सात तास हे शवविच्छेदन सुरू होते. इन कॅमेरा ते करण्यात आले असून, त्यात पाच डॉक्टरांचा समावेश होता.

अक्षय शिंदेचे शवविच्छेदन झाल्यानंतर ठाणे पोलीस रुग्णालयातून बाहेर पडले होते. महत्त्वाची बाब म्हणजे अक्षय शिंदेचा मृतदेह कुटुंबीयांकडे सुपूर्द करण्यात आलेला नाही. त्याचा मृतदेह कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाती शवगरात ठेवण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

जेजे रुग्णालयातील सूत्रांनी सांगितले की, राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या नियमावलीनुसार पोस्टमार्टेम करण्यात आले. अक्षय शिंदेचा गोळी लागल्यानंतर कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात नेण्यात आले होते. डॉक्टरांनी मृत घोषित केल्यानंतर त्याचा मृतदेह जे.जे. रुग्णालयात पोस्टमार्टेमसाठी नेण्यात आला होता.

## गाडगेनगर परिसरात प्लास्टिक पिशव्या तपासणी मोहीम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती–** महापालिकाआयुक्त, उपायुक्त व वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) यांच्या आदेशानुसार सोमवार, २३ सप्टेंबर रोजी स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत स्वच्छता ही सेवा पंधरवाडा उपक्रमाच्या अनुषंगाने उत्तर झोन क्रमांक १ रामपुरी कॅम्पमधील शेगाव नाका ते गाडगेनगर मार्गावरील आस्थापनाधारकांकडे प्लास्टिक पिशव्यांची तपासणी मोहीम राबविण्यात आली.

त्या अंतर्गत या परिसरातील ३० आस्थापनांची तपासणी करण्यात आली. त्यात २ आस्थापनाधारकांकडे डिस्पोजेबल ग्लास व प्लास्टिक पिशव्या आढळून आल्याने त्यांना प्रत्येकी ५ हजार रुपये दंड आकारून तो वसूल करण्यात आला सोबतच एका आस्थापनाधारकाकडे डस्टबिन आढळून न आल्याने त्यांना ५०० रुपये दंड आकारून तो वसूलकरण्यात आला. या कारवाई डिस्पोजेबल प्लास्टिक जप्त करण्यात आले.

सदर मोहिमेत ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक राजू डिक्याव, स्वास्थ निरीक्षक विक्की जैदे, विनोद टांक, मिथून उसरे, इम्रान खान, प्रवीण उसरे, आकीब शेख, सुमेध मेश्राम आदींचा सहभाग होता.

# निवडणुकीदरम्यान मतभेद बाजूला ठेवा, गटबाजी खपवून घेणार नाही

## अमित शाहांनी टोचले कान


**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ अमरावती–** 'पार्टी विथ अ डिफरन्स' अशी प्रतिमा असलेल्या भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नागपुरात येऊन पक्षातील गटबाजीवरून पदाधिकाऱ्यांचे कान टोचले.

राजकारणात काम करत असताना अनेकदा मतभेद होत असतात. तर विविध कारणांमुळे अनेकांना उमेदवारी मिळत नाही. त्यातून गटबाजी निर्माण होते. मात्र निवडणूक काळात पक्षात अशी गटबाजी खपवून घेणार नाही. सर्वांनी अंतर्गत मतभेद बाजुला सारून एकत्रित निवडणूकीचे काम केले पाहिजे, असे प्रतिपादन अमित शाह यांनी केले.

विशेष म्हणजे उपस्थित हजारो पदाधिकाऱ्यांकडून त्यांनी ही बाब वदवून घेतली. नागपुरात विदर्भातील ६२ विधानसभांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या कार्यकर्ता बैठकीदरम्यान ते बोलत होते.

कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित या



बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पक्षाचे राज्य प्रभारी भूपेंद्र यादव, राष्ट्रीय सहसंघटनमंत्री शिव प्रकाश, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, निवडणूक संचालन समितीचे अध्यक्ष रावसाहेब दानवे, मध्यप्रदेशचे मंत्री कैलास विजयवर्गीय, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, माजी केंद्रीय राज्यमंत्री हंसराज अहीर, रणधीर सावरकर प्रामुख्याने उपस्थित होते.

एका तिकीटासाठी अनेक दावेदार असतात. मात्र सर्वेक्षण, जातीय समीकरणे इत्यादी बाबी पाहून उमेदवारी निश्चित करावी लागते. जर तिकीट मिळाले नाही तर त्यावरून कुणीही असंतुष्ट होऊन त्यावर गोंधळ घालत आहे असे प्रकार विदर्भात दिसायला नको, असे परखड मत अमित शाह यांनी व्यक्त केले. सर्वांनी कटुता दूर सारून महायुतीसाठी मैदानात उतरले पाहिजे. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचा धनुष्यबाण व अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे चिन्ह असलेल्या घड्याळीच्या उमेदवारांचा कमळाप्रमाणेच पूर्ण ताकदीने प्रचार झाला पाहिजे, असे अमित शाह यांनी स्पष्ट केले.

महाविकास आघाडीला बुथपातळीवर कमकुवत करा

यावेळी अमित शहा यांनी भाजपच्या प्रत्येक पदाधिकाऱ्याने बुथपातळीवर जाऊन काम करण्याचे आवाहन केले. महाविकास आघाडीतील शिवसेना, राष्ट्रवादी व काँग्रेसचे बुथपातळीवरील कार्यकर्ते भाजपमध्ये आणण्यासाठी प्रयत्न करा. विरोधकांना बुथपातळीवर कमकुवत करण्यावर भर द्या, असे अमित शाह यावेळी म्हणाले.

### विदर्भात महायुतीला ४५ जागा हव्यात

भाजपचे महाराष्ट्रातील नेते विदर्भात महायुतीला ४० ते ४२ जागा मिळाव्यात यासाठी प्रयत्न करत आहेत. मात्र जर महाराष्ट्रात सत्ता हवी असेल तर विदर्भात कमीत कमी ४५ जागांवर विजय आवश्यक आहे. त्यामुळे त्या दृष्टीने नियोजन करायला हवे, असे निर्देश अमित अमित शाह यांनी दिले.

### वक्फ संशोधन बिल पुढील अधिवेशनात पास होणार

देशभरात वक्फ संशोधन बिलावरून विविध चर्चांना उधाण आले आहे. याबाबत गृहमंत्री अमित शाह यांनी महत्त्वाची माहिती दिली. हे बिल संसदेच्या पुढील अधिवेशनात मंजूर होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

## सिद्धिविनायकाच्या महाप्रसादात उंदीर असल्याचा व्हिडिओ व्हायरल

### ट्रस्ट करणार चौकशी, अध्यक्ष म्हणतात हे साफ खोटे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ मुंबई –** आंध्र प्रदेशातील तिरुमला बालाजी मंदिराच्या प्रसादात चरबीयुक्त तूप वापरल्याचा आरोप होत आहे. त्यातच आता मुंबईतील श्री सिद्धिविनायक मंदिरातील प्रसादासाठी लाडवांच्या पाकिटावर उंदीर फिरत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्यामुळे येथील प्रसादाच्या गुणवत्तेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

हा व्हिडिओ सिद्धिविनायक मंदिरातीलच आहे का, याची



पुष्टी अजून कुणीही केलेली नाही. या प्रकाराची चौकशी करण्याच्या सूचना सिद्धिविनायक ट्रस्टच्या सचिव वीणा पाटील यांनी दिल्या आहेत. तसेच मंदिरातील सीसीटीव्ही फुटेजही तपासणार असल्याचे त्या म्हणाल्या.

### मंदिरातील व्हिडिओ नाही, हे कुणाचे तरी षड्यंत्र

व्हायरल व्हिडिओ सिद्धिविनायक मंदिरातील नाही. हे कुणाचे तरी षड्यंत्र आहे. तो व्हिडिओ कधीचा आहे, कुठला आहे, हे काहीही समजत नाही. फक्त प्लास्टिकमध्ये बंद काहीतरी असल्याचे दिसत आहे. **– सदा सरवणकर,** अध्यक्ष, सिद्धिविनायक मंदिर समिती.

## जिल्हा शालेय कबड्डीचा महासंग्राम; १८८ संघ झुंजतील

### २९ सप्टेंबरपासून रंगणार सामने; कमी खर्चामुळे यंदा संघांचे प्रवेशही वाढले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ अमरावती–** जिल्हा शालेय क्रीडा स्पर्धेअंतर्गत श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर २९ सप्टेंबरपासून कबड्डीचा महासंग्राम रंगणार आहे. यंदा एकूण १८८ संघ १४, १७ व १९ वर्षांखालील वयोगटात जेते पदासाठी झुंजतील. कबड्डी हा सर्वसामान्यांचा खेळ आहे. हा खेळ बघितला की, सहजच कोणामध्येही उत्साह निर्माण होतो. त्यामुळेच ग्रामीण व शहरी भागात या खेळाकडे आकर्षित होणाऱ्या खेळाडूंची संख्या सर्वाधिक आहे. या खेळात स्पर्धाही जास्त असल्यामुळे सामने चुरशीचे होतात. संघात स्थान मिळवण्यासाठी अनेक खेळाडूंमध्ये चुरस असते. त्यामुळे सामनेही चांगलेच रंगतदार होतात.

चुन्याच्या पावडरने मैदान आखले की,



खेळ सुरू करता येतो. एरव्ही आंतरराष्ट्रीय स्तरावर मॅटवर कबड्डी खेळली जात असून, खेळाडूंना बुटांचीही आवश्यकता भासते. परंतु, जिल्हा शालेय क्रीडा स्पर्धा ही मातीवर खेळवली जाते. त्यामुळे सहभागी होणाऱ्या शाळांच्या संघांसह खेळाडूंपुढे कोणतीही अडचण नसते. त्यामुळेच गेल्या वर्षीपासून जिल्हा शालेय क्रीडा स्पर्धेत कबड्डी हा खेळ महासंग्राम ठरत आहे. कारण, अन्य कोणत्याही खेळात एवढ्या मोठ्या संख्येत संघ व खेळाडू सहभागी होत नाही. यंदा १४ वर्षांखालील मुलांच्या गटात ५३, मुलींच्या गटात १८, १७ वर्षांखालील मुलांच्या गटात ६१ व मुलींच्या गटात २४ तसेच १९ वर्षांखालील मुलांच्या गटात २२ व मुलींच्या गटात १० संघांनी आतापर्यंत प्रवेश निश्चित केले आहेत. गेल्या वर्षी १५० संघ सहभागी झाले होते. यंदा २८ संघ जास्त आहेत. पालकांनाही आपल्या पाल्याने शिक्षणासोबतच खेळ, कला क्षेत्रातही नाव कमवावे असे वाटायला लागले आहे. खेळांबाबत पालकांमध्येही आवड, जागृती निर्माण झाली आहे. शाळा व्यवस्थापनही खेळाडूंना सतत प्रोत्साहन देत आहे. जेणेकरून शाळेतून उत्तम खेळाडू घडावे. या सर्वच कारणांमुळे खेळाबद्दल उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. परिणामी खेळाडूंसह संघांचा सहभागही वाढत आहे.

## ‘छात्र तरंग’ युवा महोत्सवात २७ कलाविष्काराचे दर्शन

### २७ ते ३० सप्टेंबर दरम्यान आयोजन,; ५ जिल्ह्यातील २०३ महाविद्यालयांचा समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती–** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या वतीने छात्र तरंग' युवा महोत्सव २०२४-२५ चे आयोजन अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात २७ ते ३० सप्टेंबर दरम्यान करण्यात आले आहे. या महोत्सवात अमरावती, यवतमाळ, वाशीम, बुलडाणा, अकोला या पाच जिल्ह्यांमधील २०३ महाविद्यालयातील जवळपास दोन हजार विद्यार्थी दररोज सहभाग घेणार आहेत.

महोत्सवाचे उद्घाटन २७ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता अकोल्याचे खासदार अनुप धोत्रे यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते असतील. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी अजित कुंभार, प्रभारी कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्ष डॉ. ताराताई हातवळणे उपस्थित राहणार आहेत.

युवा महोत्सवाचा समारोप




कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी नीलेश जळमकर, अंकुर वाढवे, आ. वसंत खंडेलवाल, ॲड. गिरीश देशपांडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अकोल्यात होणाऱ्या या युवा महोत्सवाचा आनंद घ्यावा असे आवाहन कुलसचिव डॉ. अविनाश असणारे, प्राचार्य जगदीश साबू, डॉ. राजीव बोरकर, संचालक विद्यार्थी विकास डॉ. ज्ञानसागर भोकरे, प्रा. सुमेध कावळे, डॉ. निशा वराडे, अरुण शेळके यांनी मंगळवारी आयोजित पत्रकार परिषदेत केले.

२७ ते ३० सप्टेंबर दरम्यान खुले रंगमंच, भिकमचंद विद्यालय, पद्मानंद सभागृह, मदनलाल खंडेलवाल सभागृह, मोहरीदेवी खंडेलवाल विद्यालय, खंडेलवाल इंग्लिश प्रायमरी स्कूल, ॲड. दादा देशपांडे सभागृह, वसंत सभागृह, भाऊसाहेब गोडबोले सभागृह या ठिकाणी लोक व आदिवासी नृत्य, लोकसंगीत वाद्यवृंद, पाश्चिमात्य गायन, समूहगान, एकांकिका, प्रहसन, मूकनाट्य, शास्त्रीय गायन, भारतीय समूहगान, नकला, प्रश्नमंजुषा, चिकटकला, स्थळ छायाचित्रण, सुगम संगीत, वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा,पोस्टर मेकींग, व्यंगचित्रे, मातीकला, रांगोळी, स्थापना, मेहंदी आदी २७ कलाप्रकार सादर होणार आहेत.

## शरद पवारांचा जरांगेंना पूर्ण पाठिंबा

### ते निवडणुकीनंतर मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याचा प्रयत्न करतील – प्रकाश आंबेडकर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अकोला–** विधानसभा निवडणुकीनंतर शरद पवार हे मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण देण्यासाठी संपूर्णपणे प्रयत्न करतील, असा गंभीर आरोप वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. शरद पवार हे मनोज जरांगे पाटील यांच्यासोबतच आहेत, हे आता स्पष्ट झाले असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे. यासंदर्भात विधानसभा निवडणुकीनंतर शरद पवार प्रयत्न करणार असल्याचा दावा देखील प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे.मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील हे पुन्हा एकदा उपोषणाला बसले



आहेत. त्यांच्या या उपोषणामुळे आता पुन्हा एकदा मराठा विरुद्ध ओबीसी वाद राज्यभरात चर्चेचा विषय ठरत आहे. त्यातच वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी शरद पवार यांच्यावर हा आरोप केला आहे. शरद पवार हे जरांगे पाटील यांच्याबरोबर आहेत, हे आता स्पष्ट झाले आहे. मराठा समाजाला ओबीसीतूनच आरक्षण मिळाले पाहिजे, या मागणीला शरद पवार यांचा पूर्णपणे पाठिंबा आहे. त्यासाठी ते प्रयत्न करतील, असे देखील स्पष्ट झाले आहे. मात्र शरद पवार यांचा हा प्रयत्न विधानसभेच्या निवडणुकीनंतर होईल, असे देखील प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.

# साहेब ! नितेश राणेंना जुळ्या शहरात येऊच देऊ नका

## सर्वधर्मीय महिला व पुरुषांचे एसडीओंना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अचलपूर**



भाजपाचे आमदार नीतेश राणे २९ सप्टेंबरला परतवाडा, अचलपूर दौऱ्यावर असून ते जुळ्या शहरात मोर्चा काढणार असल्यामुळे काही सामाजिक संघटनांनी त्यांच्या मोर्चाला विरोध केला आहे. यासंदर्भात उपविभागीय अधिकारी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी यांना निवेदन सादर करून दौरा रद्द करण्याची मागणी करण्यात आली.

नितेश राणे मागील काही दिवसांपासून वादग्रस्त वक्तव्य करीत आहेत. त्यामुळे धार्मिक, सामाजिक सलोखा धोक्यात येत असून समाजात जातीय तेढ निर्माण होण्याची शक्यता आहे. जुळे शहर अतिसंवेदनशील असल्याची नोंद शासनदरबारी आहे. धार्मिक दंगली झाल्याचा इतिहास अद्यापही शहरवासी विसरलेले नाहीत. त्यामुळे अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी धार्मिक सलोखा ठेवण्याचे प्रयत्न होणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे नितेश राणे यांना रोखण्यासाठी जुळ्या शहरातील काही सामाजिक संघटना सरसावल्या असून त्यांनी राणे यांच्या दौऱ्याला व सभेला विरोध केला आहे. याबाबत निवेदनही देण्यात आले. शिष्टमंडळात ज्येष्ठ नागरिक संघाचेसुभाष उभाड, तुळशीदास राहाटे, मराठा सेवा संघाचे मालठाने, श्रीकृष्ण कड, गावंडे, संभाजी ब्रिगेडचे दिनेश ठाकरे, मंगेश मालठाने, जिजाऊ ब्रिगेडच्या कडू, प्रीती गाडगे, क्रांतिज्योती ब्रिगेडच्या निलीमा मुळे, चमक बुच्या माजी उपसरपंच मंजू कळसकर, महात्मा फुले ब्रिगेडचे स्वप्निल बोबडे, बामसेफचे सूरज गावंडे, प्रशांत वाटाणे, रिपब्लिकन एकता मंचचे रिंकू दांडगे, नीलेश वर्षे, पार्टी येथील अनिल सोळंके, देवीदास विसंदरे, कुंभी वाघोली येथील अरुण शेलेकर, जनोना येथील सुनील बेलसरे, राकेश दहिकर, वाघडोह येथील तेजस सोनोने, बिस्मिल्ला भाई, रयतचे राहुल कडू यांचा सहभाग होता.

# तयारी नवरात्र उत्सवाची ...




**अमरावती च्या एकविरा देवी व अंबादेवी मंदिरात नवरात्र उत्सवाची तयारी सुरु करण्यात आली . रविवारी एकविरा देवीचे आभूषणे स्वच्छ करून त्याला पॉलीश करण्यात आली. तर दुसऱ्या छायाचित्रात श्री एकविरा देवी मंदिरात नवरात्र उत्सव निमित्ताने चांदीचे खांब तयार करण्यात येत आहे, नाशिक येथील कारागीर हे काम करीत आहे .**

# दिवाळीपूर्वी आर्थिक मागण्या पूर्ण करा; अन्यथा कामबंद

## महापालिका कर्मचारी संघटनेचा इशारा : मालमत्ताकराच्या स्थगितीमुळे प्रशासनापुढे आर्थिक संकट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**

आस्थापनेवरील सर्व कार्यरत अधिकारी कर्मचारी, सफाई कामगार व सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या आर्थिक मागण्या अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे त्या मागण्यांची पूर्तता दिवाळीपूर्वी करण्यात यावी, अन्यथा ८ ऑक्टोबरपासून बेमुदत कामबंदचा इशारा महापालिका कर्मचारी संघटनेकडून देण्यात आला आहे. एकीकडे महापालिकेची आर्थिक परिस्थिती खालावत असताना, दुसरीकडे मालमत्ताकराच्या पुनर्रमूल्यांकनाला शासनाने स्थगिती दिली असल्याने महापालिकेसमोरील आर्थिक संकटांचा डोंगर वाढतच चालला आहे. त्यातच आता कर्मचारी संघटनेने कामबंदचा पवित्रा घेतला असल्याने प्रशासनापुढे




पेच निर्माण झाला आहे.

दरम्यान, प्रशासनाने आर्थिक मागण्या पूर्ण करण्याच्या अनुषंगाने वेळोवेळी लेखी व तोंडी आश्वासने देऊनही अद्याप आश्वासनांची पूर्तता केली नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे. येत्या काही दिवसांत म्हणजे १ नोव्हेंबर रोजी दिवाळीचा सण येत आहे. त्यामुळे दिवाळीपूर्वी मागण्या पूर्ण करण्याचे निवेदन आयुक्तांना देण्यात आले आहे. सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकीचा पहिला हप्ता दिवाळीच्या सात दिवसांच्या अगोदर अदा करण्यात यावा, महागाई भत्त्याची सहा महिन्यांची थकबाकीची रक्कम त्वरित अदा करण्यात यावी, सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या मागील वर्षीची थकबाकीची उर्वरित रक्कम अदा करण्यात यावी, आदी मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आली असल्याची माहिती कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस प्रल्हाद कोतवाल यांनी दिली.

# कपाशी, सोयाबीन पिकासाठी उद्यापासून शासनाकडून मदत

## यापूर्वी १० सप्टेंबरचा मुहूर्त : १.६१ लाख कृषकांची केवायसी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**



गतवर्षी कपाशी व सोयाबीनला योग्य भाव मिळाला नाही. त्यामुळे दोन हेक्टर मर्यादेत हेक्टरी पाच हजारांची मदत शेतकऱ्यांना दिली जाणार आहे. याबाबत ई-पीक पाहणी केलेल्या शेतकऱ्यांच्या याद्या जमाबंदी विभागाने कृषी विभागाला पुरविल्या होत्या. यापैकी सद्यस्थितीत १६१५०८ शेतकऱ्यांनी ई-केवायसीची प्रक्रिया केल्याने त्यांना २६ सप्टेंबरपासून शासन मदत मिळण्याची शक्यता आहे. हेक्टरी पाच हजारांची मदत १० सप्टेंबरपासून देण्यात येणार होती. मात्र, हा मुहूर्त हुकला व त्यानंतर आता कृषिमंत्री यांनी २६ तारीख जाहीर केली. या भावांतर योजनेसाठी पोर्टल सुरू करण्यात आले व कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील ३,५३,६८३ लाख शेतकऱ्यांना त्यांच्या पेऱ्यानुसार शासन मदत मिळू शकते. भावांतर योजनेसाठी जमाबंदी विभागाने शेतकऱ्यांच्या याद्या कृषी विभागाला पुरविल्या. यामध्ये अनेक शेतकऱ्यांची नावे गहाळ असल्याने पुरवणी यादी पाठविण्यात आली. त्यामध्येदेखील काही गावे व शेतकऱ्यांनाची नावे नाहीत.

### संयुक्त खातेदारांना द्यावे लागेल ॲफिडेव्हिट

संयुक्त खातेदार नाहरकत प्रमाणपत्रावर इतर सहहिस्सेदारांच्या स्वतःच सह्या करीत आहे. एकापेक्षा अधिक खातेदार सर्वांच्या सह्यांचे नाहरकत प्रमाणपत्र आणून देत असल्याने रक्कम कोणाच्या खात्यावर जमा करावी, याचा पेच निर्माण होत आहे. त्यामुळे सर्व सहहिस्सेदारांच्या स्वाक्षरीचे ॲफिडेव्हिट हे ज्याच्या खात्यात रक्कम जमा करावयाची आहे, त्यांना कृषी सहायकांकडे सादर करावे लागेल.शेतकऱ्यांनी कृषी सहायकांकडे संमतिपत्र व संयुक्त सात- बाराधारक शेतकऱ्यांनी शपथपत्र जमा करून आधारबेस ओटीपी पद्धतीने ई-केवायसीची प्रक्रिया त्वरित करावी.

**राहुल सातपुते जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी**

# बेलोरा विमानतळाला लोकमहर्षीचे नाव द्या

## संकल्प शेतकरी संघटनेची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५बडनेरा**



बेलोरा विमानतळाला लोकमहर्षी भाऊसाहेब देशमुख यांचे नाव देण्याची मागणी संकल्प शेतकरी संघटनेचे अध्यक्ष नितीन कदम यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनातून दिलेल्या केली. यावेळी त्यांच्यासोबत मोठ्या संख्येत कार्यकर्ते उपस्थित होते.

बेलोरा विमानतळाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. येथून लवकरच ७२ आसनी विमाने उड्डाण घेणार आहेत. या विमानतळाला स्वतंत्र भारताचे पहिले कृषिमंत्री, शिक्षणमहर्षी, लोकमहर्षी भाऊसाहेब उपाख्य डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात यावे, अशा मागणीचे निवेदन संकल्प शेतकरी संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

यावेळी संघटनेचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष संजय चुनकीकर, परवेश कदम, स्वप्निल मालधुरे, मंगेश विरुळकर, प्रणव सहारे, अभिजित सवाई, नितीन ठाकरे, प्रफुल्ल महल्ले, प्रफुल्ल कदम,विलास वायकर, रोशन सनके, सोपान भटकर, परेश मोहोळ, सौरभ चव्हाण, इंद्रजीत नागदिवे, अनिल काळे, गजू बिहार, रमेश लढे, प्रवीण सुके, बंडू बुरघाटे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# उत्पन्न वाढीसाठी चालक-वाहकांना मिळणार प्रोत्साहन भत्ता; त्याच दिवशी रोख स्वरूपात दोघांना सम प्रमाणात वाटण्यात येणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५ अमरावती**

प्रवासी वाहतूक करीत असतांना महामंडळाचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने जास्तीत जास्त उत्पन्न आणणार्या चालक व वाहक यांना एसटीतर्फे रोख प्रोत्साहन भत्ता देऊन त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. त्यासाठी प्रत्येक फेरीचे उत्पन्नाचे उद्दिष्ट देऊन ते उद्दिष्ट पूर्ण करुन अतिरिक्त उत्पन्न आणणार्या चालक वाहकांना उद्दिष्टापेक्षा वाढीव उत्पन्नापैकी २० टक्के रक्कम प्रोत्साहन भत्ता म्हणून दोघांना सम प्रमाणात वाटण्यात येणार आहे. सदर रक्कम त्यांची कामगिरी संपवून आगारात आल्यानंतर त्याच दिवशी रोख स्वरूपात मिळणार आहे.

एसटी महामंडळाने आपले उत्पन्न वाढावे म्हणून विविध उपयोजना व अभिनव उपक्रम हाती घेतले आहेत. प्रवासी राजा दिन, कामगार पालक दिन यासारखे उपक्रम राबवून



प्रवाशांच्या व कर्मचार्यांच्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच प्रत्यक्ष प्रवासात प्रवाशांना अडचण आल्यास आगार प्रमुखांचे दूरध्वनी क्रमांक प्रत्येक बसमध्ये प्रदर्शित करण्यात आले आहेत. याबरोबरच तोट्यातील आगारांना मार्गदर्शन करण्यासाठी पालक अधिकारी नियुक्त केले आहेत. इंधन बचतीसाठी चालक व यांत्रिक कर्मचारी यांचे समुपदेशन करण्यात येत आहे. शालेय विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेत जाऊन पासचे वितरण करण्यात येत आहे. या सर्व उपाययोजनांमुळे एसटी महामंडळाने ऑगस्ट, २०२४ या महिन्यात १६ कोटी ८६ लाख, ६१ हजार रुपये नफा मिळवला आहे. उत्पन्न वाढीत सातत्य राहण्यासाठी चालक-वाहक हा घटक अत्यंत महत्त्वाचा असून त्यांची कामगिरी चांगली व्हावी, त्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळणे अत्यंत आवश्यक आहे. हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून प्रायोगीक तत्त्वावर एक महिन्यासाठी वाढीव उत्पन्नावर आधारित प्रोत्साहन भत्ता योजना महामंडळाने सुरू केली आहे.

विशेष म्हणजे, प्रवासी तक्रार, प्रवाशांशी केलेले गैरवर्तणुक अथवा उत्पन्न वाढीसाठी अवैध मार्गाचा वापर केल्यास संबंधित चालक-वाहक यांना प्रोत्साहन भत्ता मिळणार नाही. असेही, महामंडळाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे योग्य कामगिरी करणार्या चालक-वाहकांना रोख स्वरुपात प्रोत्साहन भत्ता देऊन त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. या योजनेस चांगला प्रतिसाद मिळाल्यास सदर योजना पुढे चालू ठेवण्याबाबतही निर्णय घेण्यात येईल, असेही महमांडळाच्या वतीने कळवण्यात आले आहे.

# दसरा दिवाळी ते गांधी जयंती, ऑक्टोबरमध्ये १, २, 3 नाहीतर तब्बल १५ दिवस बँका राहणार बंद, यादी तपासा मगच घराबाहेर पडा


**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५ नागपुर**

सप्टेंबर महिना संपत आला आहे. फक्त पाच दिवस बाकी राहिले आहेत. त्यानंतर ऑक्टोबर महिना सुरु होणार आहे. या ऑक्टोबर महिन्यात अनेक दिवस बँका बंद राहणार आहेत. यामध्ये शारदीय नवरात्रीपासून दसरा आणि दिवाळीपर्यंतच्या सुट्ट्यांचा समावेश आहे. त्यामुळं या काळात जर तुमची बँकांच्या संदर्भात काही कामं असतील तर ती सुट्टांची यादी बघूनच बँकेत जावं लागेल. अन्यथा अचणींचा सामना करावा लागेल.

**सणांमुळे अनेक दिवस बँकाना सुट्ट्या असणार**

ऑक्टोबर २०२४ मध्ये सणांमुळे अनेक दिवस बँकाना सुट्ट्या असणार आहेत. यामध्ये शारदीय नवरात्रीपासून दसरा आणि दिवाळीपर्यंतच्या सुट्ट्यांचा समावेश आहे. तुम्हालाही ऑक्टोबरमध्ये बँकांशी संबंधित काही महत्त्वाचे काम असेल तर येथील सुट्ट्यांची यादी पाहूनच घराबाहेर पडा. दरम्यान, ग्राहकांच्या सोयीसाठी रिझर्व्ह बँक महिना सुरू होण्यापूर्वीच बँकांच्या सुट्ट्यांची यादी प्रसिद्ध करते. ठइख ने दिलेल्या माहितीनुसार, ऑक्टोबरमध्ये बँकांना ३१ दिवसांपैकी १५ दिवस सुट्ट्या असणार आहेत. त्यात शनिवार आणि रविवारच्या सुट्यांव्यतिरिक्त विविध सणांच्या सुट्ट्यांचाही समावेश आहे. जम्मू-काश्मीरमधील विधानसभा निवडणुकांमुळे ऑक्टोबरमध्ये बँक एक दिवस बंद राहणार आहे. त्याचबरोबर गांधी जयंती, दुर्गापूजा, दसरा, लक्ष्मीपूजा, काटीबिहू आणि दिवाळीनिमित्त वेगवेगळ्या दिवशी बँकांना सुट्ट्या असतील.

**या दिवशी बँका राहणार बंद**




१ ऑक्टोबर २०२४- विधानसभा निवडणुकीमुळे जम्मूमध्ये बँका बंद राहतील.

२ ऑक्टोबर २०२४- गांधी जयंतीनिमित्त देशभरातील बँकांना सुट्टी असेल.

३ ऑक्टोबर २०२४- जयपूरमध्ये नवरात्रीच्या स्थापनेमुळे बँकांना सुट्टी असेल.

६ ऑक्टोबर २०२४- रविवारमुळे संपूर्ण देशात सुट्टी असेल.

१० ऑक्टोबर २०२४- अगरतला, गुवाहाटी, कोहिमा आणि कोलकाता येथे दुर्गा पूजा, दसरा आणि महासप्तमीमुळे बँका बंद

११ ऑक्टोबर २०२४- अगरतला, बेंगळुरू, भुवनेश्वर, चेन्नई, गंगटोक, गुवाहाटी, इंफाळ, इटानगर, कोहिमा, इंफाळ, कोलकाता, पाटणा आणि रांची येथील बँकांमध्ये दसरा, महाअष्टमी, महानवमी, आयुधा पूजा, दुर्गा पूजा आणि दुर्गा अष्टमी मुळे शिलाँगला सुट्टी असेल.

१२ ऑक्टोबर २०२४- दसरा, विजयादशमी, दुर्गापूजेमुळे देशभरात बँका जवळपास बंद राहणार आहेत.

१३ ऑक्टोबर २०२४- रविवारमुळे संपूर्ण देशात बँका बंद राहणार आहेत.

१४ ऑक्टोबर २०२४- गंगटोकमध्ये दुर्गा पूजा किंवा दसेनच्या निमित्ताने बँकांना सुट्टी असेल.

१६ ऑक्टोबर २०२४- लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने अगरतला आणि कोलकाता येथे बँका बंद राहतील.

१७ ऑक्टोबर २०२४- महर्षि वाल्मिकी आणि कांति बिहू निमित्त बेंगळुरू आणि गुवाहाटी येथील बँकांना सुट्टी असेल.

२० ऑक्टोबर २०२४- रविवारमुळे देशभरात बँका बंद राहतील.

२६ ऑक्टोबर २०२४- चौथ्या शनिवारमुळे देशभरात बँका बंद राहतील.

२७ ऑक्टोबर २०२४- रविवारमुळे देशभरातील बँकांना सुट्टी असेल.

३१ ऑक्टोबर २०२४- दिवाळीमुळे जवळपास संपूर्ण देशातील बँकांना सुट्टी असेल.

# जिल्हाधिकारी कार्यालयावर हजारो शिक्षकांची धडक

## आम्हाला शिकवू द्या; गुरुजींचा 'आक्रोश'! अन्याय विरुद्ध लढण्यासाठी शिक्षकासह शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी

## खासदार बळवंत वानखडे,जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष हरिभाऊ मोहोड,जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण सभापती जयंत देशमुख यांची उपस्थिती




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक प्राथमिक शाळा या उपक्रमांच्या प्रयोगशाळा बनल्या आहेत. शिक्षकांना शिकवण्याचे काम सोडून विविध ऑनलाईन कामे व अनावश्यक उपक्रम राबवल्यामुळे विद्यार्थ्यांपुढे जायला वेळच मिळत नाही.त्यामुळे आम्हाला शिकवू द्या, असा टाहो फोडत जिल्हाधिकारी कार्यालयावर बुधवारला (ता.२५) आक्रोश मोर्चा काढण्यात आला.या मोर्च्यात जिल्ह्यातील शिक्षक उस्फूर्तपणे सहभागी झाले होते.तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

सततच्या अशैक्षणिक कामांच्या वाढत्या वारंवारीतेमुळे शिक्षकांना शिकविण्यास पुरेसा वेळ मिळत नाही. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपासून शिक्षकांना दूर लोटण्याचे धोरण सरकारने आखले आहे की काय, अशी शंका उपस्थित केली जात आहे. दुर्गम भागातील कमी पटाच्या शाळा बंद करून तेथील विद्यार्थ्यांना शालेय प्रवाहातून बाहेर फेकण्याचे काम सरकार करत आहे. २० पेक्षा कमी पटाच्या शाळेवर निवृत्त शिक्षक किंवा कंत्राटी शिक्षकाची नेमणूक करून सरकार अप्रत्यक्षपणे वेठबिगारीचे धोरण राबवत आहे. शिक्षकांच्या अनेक ज्वलंत प्रश्नांबाबत शासन स्तरावरून कोणतीही अनुकूल भूमिका घेतली जात नाही. प्रश्न समजून घेणे व त्यावर तोडगा काढण्याच्या बाबत सरकार प्रचंड उदासीन आहे. त्यामुळे राज्यातील प्राथमिक शिक्षकांपुढे तीव्र आंदोलन करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. राज्यातील सर्व जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये शिकविणारे प्राथमिक शिक्षक सामूहिक रजा घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढला.

सध्या राज्याच्या शिक्षण खात्यामध्ये विविध प्रकारचे प्रयोग राबवले जात आहेत आणि शिक्षकांना वेठबिगारासारखे राबवले जात आहे. त्यामुळे शिकवण्यासाठी शिक्षकांकडे वेळच शिल्लक नाही. नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत दाखल झालेल्या शिक्षकांना १९८२ सालची जुनी पेन्शन योजना लागू करणे, शालेय पोषण आहाराच्या बदललेल्या पाककृतींमुळे शिक्षकांच्या अशैक्षणिक कामात भरच पडली असून ही योजना स्वतंत्र यंत्रणेकडे हस्तांतरित करणे, १०-२०-३० वर्ष सेवेनंतरची आश्वासित प्रगती योजना प्राथमिक शिक्षकांना लागू कराणे, मुख्यालयी राहण्याची अट शिथिल करणे, अशैक्षणिक कामे कमी करणे इत्यादी प्रमुख मागण्यांसह शिक्षकांच्या इतर अनेक मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी जिल्ह्यातील सर्व शाळेतील शिक्षक सामूहिक रजेवर जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढला.शिक्षक मोठ्या संख्येने अन्याय विरुद्ध लढण्यासाठी शिक्षकांनी सहभागी झाले होते.

तसेच महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ,महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना,महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना,शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख शिक्षक परिषद,अमरावती जिल्हा प्राथमिक शिक्षक भारती,कास्ट्राईब शिक्षक संघटना,महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना,महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद,महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ जिल्हा अमरावती,प्रहार शिक्षक संघटना,महाराष्ट्र राज्य उर्दु शिक्षक संघटना,अखिल भारतीय उर्दु शिक्षक संघटना,अखिल महाराष्ट्र उर्दु शिक्षक संघटना,महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक महामंडळ,महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ (संभाजी थोरात प्रणित),महाराष्ट्र राज्य अपग्रेड मुख्याध्यापक महासंघ,महाराष्ट्र राज्य एकल शिक्षक सेवामंच,पदवीधर प्राथमिक शिक्षक व फ्रेंद्रप्रमुख संघटना,वसंतरावजी नाईक अधिकारी कर्मचारी संघटना,चेतवा कर्मचारी संघटना यांच्यासह आदी संघटना सहभागी झाल्या होत्या.

**जिल्हाधिकारी कार्यालयासमोर झाली सभा**

यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ झालेल्या सभेला खासदार बळवंत वानखडे,जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष हरिभाऊ मोहोड,जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण सभापती जयंत देशमुख,अखिल भारतीय शिक्षक संघाचे राज्य उपाध्यक्ष,शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव देशमुख शिक्षक परिषदेचे राज्याध्यक्ष प्रभाकर झोड,महाराष्ट्र राज्य शिक्षक समितीचे राजेश सावरकर, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे नेते सुनील केणे, महाराष्ट्र नगर पालिका व महानगर पालिका शिक्षक संघटनेचे अध्यक्ष मुकेश चव्हाण,अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघटनेचे अब्दुल राजिक,कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे दादाराव भोंगाडे,सरिता काठोडे,प्रहार शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष महेश ठाकरे,महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना खाजगी विभागाचे रुपेश टाले, शाळा व्यवस्थापन समितीतर्फे मुरलीधर डहाणे सह हजारो शिक्षक सहभागी झाले होते.

जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष हरिभाऊ मोहोड यांनी जाहीर सभेत ' एकच मिशन जुनी पेन्शन ' योजनेची टोपी घालून जुनी पेन्शन योजनेला व मोर्च्यातील मागण्यांना पाठींबा जाहीर केला.

# विमा कंपनीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ मोर्शी**

नुकसानाची टक्केवारी कमी दाखविल्याने विमा कंपनी व सर्वेक्षकावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी तालुक्यातील लेहगाव येथील प्रगतशील शेतकरी अरविंद तट्टे यांच्यासह शेतकऱ्यांनी विभागीय कृषी सहसंचालक यांच्याकडे केली आहे.

सोयाबीन पिकाचे १०० टक्के नुकसान होऊनही अप्रशिक्षित सर्वेक्षकाने कमी टक्केवारी दाखविल्याने कृषी अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत पुन्हा सर्वेक्षण करण्याची मागणी अरविंद तट्टे केली. नुकसानाचे कारण पिकाचे क्षेत्र जलमय होणे असताना सर्वेक्षकाने पैशांची मागणी पूर्ण न केल्याने कारण न टाकताच सही घेतल्याचा आरोप अरविंद तट्टेयांनी तक्रारीत केला.


विमा कंपनीचे सर्वेक्षक पंचनामे करताना नुकसानाचे क्षेत्र, टक्केवारी वकारण न टाकताच शेतकऱ्यांना सह्या करण्यास बाध्य करतात, असा अनेक शेतकऱ्यांनी अनुभव कथन केला आहे. सर्व माहिती मराठीत असताना कारण इंग्लिशमध्ये 'नो लॉस' अशा स्वरूपात नमूद केले जाते. त्यामुळे नुकसान होऊनही शेतकऱ्यांना मदत मिळत नाही. यावर्षी सतत दीड महिना पाऊस बरसत असताना व तिमाही पिके पूर्णपणे उद्धवस्त झाली असताना कृषी विभाग व शासन बघ्याची भूमिका घेत असल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

# २९ सप्टेंबर रोजी तुतारी वादन अभिनव स्पर्धा


## जिल्ह्यात पहिल्यांदाच होणार स्पर्धा : मोठ्या संख्येने सहभागी व्हा - प्रा. डॉ.हेमंत देशमुख

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

अमरावती जिल्ह्यात पहिल्यांदाच तुतारी वादन ही अभिनव स्पर्धा आयोजित करण्यात आली असून रविवार २९ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता जाधव पॅलेस नवाथे नगर अमरावती येथे या स्पर्धेला शुभारंभ होणार आहे.विविध कला जोपासल्या जाव्यात, कलेला व्यासपीठ मिळावं, लुप्त होत चाललेला व्यवसाय टिकावा, लोकांना त्यांच्या कलेतून व्यवसाय मिळावा अशा अनेक उद्देशाच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष प्रा.डॉ.हेमंत देशमुख यांनी भव्य तुतारी वादन स्पर्धेचे आयोजन केले आहे. प्राथमिक फेरी अमरावती जिल्ह्यातून त्यानंतर विभागीय आणि मग राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. कोणत्याही शुभप्रसंगी, उद्घाटनाप्रसंगी, नवीन कार्याला सुरुवात करण्याप्रसंगी किंवा एखाद्या आनंदाच्या प्रसंगी तुतारी



वाजविली जाते. युद्धाच्या किंवा विजयाच्या नंतर वाजविले जाणारे वाद्य म्हणजे तुतारी होय. मात्र आज या कलेला अपेक्षित असे प्रोत्साहन मिळत नसल्याने या व्यवसायातील लोकांवर उपासमारीची पाळी आली आहे. तुतारी या कलेचा प्रचार व प्रसार व्हावा या हेतूने आयोजित करण्यात आलेल्या भव्य तुतारी वाजवा स्पर्धेत कलावंतांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन आयोजक प्रा.डॉ. हेमंत देशमुख यांनी केले आहे.तुतारी वादन स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना प्रथम बक्षीस रोख ७००० रुपये सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र,द्वितीय पारितोषिक रोख ५००० सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, तृतीय



पारितोषिक रोख ३००० सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच प्रोत्साहन एक हजाराचे दोन बक्षिसे देऊन कलावंतांचा गौरव करण्यात येईल. या स्पर्धेसाठी नामांकित परीक्षकांना निमंत्रित करण्यात आले असून उत्स्फूर्त तुतारी वाजविणाऱ्या स्पर्धकांनी वेळ, सूर आणि तुतारी वाजविण्याच्या पद्धतिचा अवलंब करून स्पर्धेचे नियम पाळावे असे आयोजकाच्या वतीने कळविण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांसाठी आयोजकाच्या वतीने तुतारीची व्यवस्था करण्यात आली असून शक्यतो ड्रेसकोड मध्ये स्पर्धकांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्यांनी सदानंद खंडारे - ९८२२६२५९६३ यश इंगोले-७०३०५६२७७४ यांच्याशी संपर्क करावा.

# ठाणेदार बिना पैशाचं काम करत नाही, चारित्र्याचा दाखला मिळवण्यासाठी १०० रुपये घेतात; 'देवाचान्याय' ट्रेंडवरुन बच्चू कडूंची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २५ अमरावती.**

आगामी विधानसभा निवडणुकीत आम्ही महाशक्ती म्हणून समोर जाणार असून २८८ जागांवर लढणार आहोत. छत्रपती संभाजीनगर येथील बैठक झाल्यावर जागा वाटपाची रचना केली जाणार आहे, अशी माहिती प्रहार पक्षाचे सर्वेसर्वा आणि आमदार बच्चू कडू यांनी दिली आहे. ते नागपूर येथे बोलत होते. त्यामुळे आमदार बच्चू कडू महाशक्ती म्हणून आगामी निवडणुकांना समोर जाण्याच्या निर्णयावर ठाम असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला आहे.

दरम्यान, त्यांनी महायुती आणि भाजपच्या नेत्यांवरही टीका केली आहे. सोबतच आमची महाशक्ती आहे, त्यात युती नाही, अन् नाही आघाडी. त्यामुळे सरकार हम बनायेंगे असे म्हणत राज्यात आमचे सरकार सत्तेत येईल असा दावाही आमदार बच्चू कडू यांनी केला आहे. तर बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा एन्काऊंटर प्रकरणानंतर 'देवाचान्याय' असं एक्स प्लॅटफॉर्मवर (आधीचे ट्विटर) ट्रेंड सुरु आहे. यावर भाष्य करताना बच्चू कडू यांनी शेलक्या शब्दात टीका केली आहे.

बदलापूर लैंगिक प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा काल पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत मृत्यू झाला. या खळबळजनक घटनेनंतर विरोधकांनी पोलीस आणि राज्य सरकारवर प्रश्न उपस्थित केले आहेत. तर दुसरीकडे सोशल



मीडियावर अक्षय शिंदे एन्काऊंटर प्रकरणाचं समर्थन करण्यात येत आहे. बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा एन्काऊंटर प्रकरणानंतर 'देवाचान्याय' असं एक्स प्लॅटफॉर्मवर (आधीचे ट्विटर) ट्रेंड सुरु आहे. देशभरातील एक्सवर ट्रेंडमध्ये देवाचान्याय पहिल्या क्रमांकावर असल्याचं दिसून येत आहे. बदलापूर एन्काऊंटर प्रकरणानंतर सोशल मीडियावर एन्काऊंटरचं जोरदार समर्थन करण्यात येत आहे. तसेच गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समर्थनार्थ सोशल मीडियावर हजारो पोस्ट केल्या जात आहेत.

या विषयी भाष्य करताना बच्चू कडू म्हणाले की, आज राज्यातील पोलीस स्टेशनमध्ये बघितलं तर ७५ टक्के ठाणेदार बिना पैशाचं काम करत नाही, अशी राज्याची स्थिती आहे. महाराष्ट्र सोडा नागपूर येथील पोलीस बघितली तर किती लोकांना त्रास होतो, कशी कारवाई होते, यावर एखांद्याने पीएचडी करावी. राज्यातील कुठल्याही मंत्र्याचं महाराष्ट्रात वचक नाही. अशी बोचरी टीका बच्चू कडू यांनी केलीय. किंबहुना चारित्र्याचा दाखला मिळवण्यासाठी पोलीस १०० रुपये सुद्धा घेतात, असा आरोपही त्यांनी यावेळी केलाय. बदलापूर लैंगिक प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा जो एन्काऊंटर झाला, तो कधी झाला मला त्याची कल्पना नाही. आम्ही गावाकडे शेती करत असतो टिव्ही पाहत नाही. असे म्हणत बच्चू कडू यांनी यावर अधिक बोलणे टाळले आहे.

**हेतू चांगला असेल तर कधी कधी नियम बाजूला ठेवावे लागतात- बच्चू कडू**

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संस्थेला शासकीय भूखंड देण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. अजित पवार यांचे अर्थ खात आणि राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या महसूल खात्याचा विरोध असूनही बावनकुळे यांच्याशी संबंधित असलेल्या 'महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी' या संस्थेला तंत्रशिक्षण आणि नर्सिंग महाविद्यालय उभारण्यासाठी पाच हेक्टरचा भूखंड बहाल करण्यात आला आहे. रेडीरेकनर दरानुसार या भूखंडाची किंमत तब्बल पाच कोटी इतकी असल्याचे सांगितले जाते. मात्र, चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संस्थेला हा कवडीमोल दरात देण्यात आल्याने वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. अशातच या प्रकरणावर भाष्य करताना आमदार बच्चू कडू म्हणाले की, हेतू चांगला असेल तर कधी कधी नियम बाजूला ठेवावे लागतात. अशा कितीतरी जागा काँग्रेस आणि भाजपवाल्यांनी बळकवल्या असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केलाय.

# शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांनी काढली मुख्यमंत्र्यांची प्रतिकात्मक तिरडी : मानधनात वाढ करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**

वारंवार आंदोलन निवेदन देऊनही शासन मागण्यांकडे लक्ष देत नसल्याने संतप्त शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांनी आज २५ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता स्थानिक इर्विन चौक स्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या पासून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांची प्रतिकात्मक तिरडी काढत जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत आंदोलन केले. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण



योजनेअंतर्गत शाळेत पोषण आहार तयार करून मुलांना जेवण देणाऱ्या कर्मचाऱ्यांना केंद्र सरकार कडून ६० टक्के व राज्य सरकार कडून ४० टक्के असे अडीच हजार रुपये मानधन दिल्या जाते. राज्य सरकारने मानधनात वाढ करू असे आश्वासनही दिले. मात्र, त्याची पूर्तता अद्यापही झाली नाही. त्यामुळे शालेय पोषण कर्मचाऱ्यांना मानधन वाढ करण्यात यावी, जिल्ह्यातील सेंट्रल किचन बंद करण्यात यावे यासह विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या. यावेळी आंदोलकांनी तिरडी समोर मोठा आक्रोश केला. राज्य सरकारने तात्काळ मागण्या मान्य न केल्यास येत्या काळात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

